PRGI Reg. No.MHMAR/25/A0219

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

वर्ष: १ अंक:७५ पाने-८

नाशिक गुरुवार, १४ ऑगस्ट २०२५ किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

अग्राग्रलेख

## खरीखरी

## कुणीतरी या गरीब मुंडेंना घर द्या, हो घर...

काही महिन्यापूर्वी महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात धनंजय मुंडे मंत्री होते. अगदी तळागाळातून वर आलेल्या या बिचाऱ्या गरीब माणसाला फारसे मोठे कारण नसताना मंत्री पदाहून काढले गेले आणि त्यानंतर आता मुंबई शहरात त्यांच्यासाठी घर नाही. त्यामुळेच मंत्री असतानाचे त्यांचे घर म्हणजे ते जे अत्यंत छोटे घर वापरीत आहेत. त्याच्या विरोधात ही काही विघ्न संतोषी विरोधक बोंबा मारीत आहेत. बरे त्या लहानशा घराचे नाव सातपुडा आहे. वास्तविक पाहता एवढ्याशा इटुकल्या घराला सातपुडा सारख्या विशाल पर्वताचे नाव देणे हा सातपुडा पर्वतगिरीचा अपमान नाही का. केवळ दहा-पंधरा हजार फुटांच्या घरात बिचाऱ्या धनंजय रावांना आहे तिथेच राहू दिले तर सरकारचे काय बिघडणार आहे. धनंजय रावांची माजी बायको करूणा ताई मुंडे विनाकारण धनंजय भाऊंच्याच नावाने खोट्या वावड्या पसरवीत आहे असे दिसते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे धनंजय मुंडे यांचे मुंबईत किमान तीन ते चार फ्लॅट आहेत. ते नाहीत असे आम्ही कुठे म्हणतो, पण धनंजय मुंडे यांचा परिवार किती मोठा आहे याचा विचार तुम्ही करणार आहे की नाही. सध्या वेगवेगळ्या ठिकाणी सरकारी पाहुणचार घेत असलेली अनेक हरिभक्त परायण मंडळी त्यामध्ये आहेत. खरंतर धनंजय मुंडे यांच्या विरोधकांना विरोधाभास कळलाच नाही असे आम्हाला म्हणावेसे वाटते. कारण धनंजय मुंडे यांच्यासारख्या धार्मिक भावना जोपासणाऱ्या माणसाला असा त्रास देणे आम्हाला मुळीच मंजूर नाही. खरंतर त्यांच्याबद्दल सर्वांनाच करूणा अगदी सद्गदित पद्धतीने दाटून आली पाहिजे. कधीतरी चांगल्या माणसांच्या भावनांचा विचार कोणी करणार की नाही, हेही या निमित्ताने विचारावसे वाटते. घर खाली करण्यासाठी जे जे विरोधक आरोळी देत आहेत त्यांना घरघर लागो आणि ते नरकात जावोत. असे धनंजय समर्थकांचे म्हणणे आहे, कारण धनंजय मुंडे हे बीड जिल्ह्याचे थोर सुपुत्र आहेत. काही काळापूर्वी ते आपल्या महाराष्ट्राचे मंत्री होते. आपण थोर नेते आहोतच हा त्यांचा दावा आहे तो अमान्य करण्याचा अनेक फटकेबाज नेते कावा करीत आहेत, असे आम्हाला वाटते. बीड जिल्ह्याच्या या सुपुत्राला मुंबईची मुंबादेवी पावली पाहिजे, अशी आमची शुभेच्छा आहे. जोपर्यंत मुंडे यांना घर मिळत नाही तोपर्यंत त्यांच्या माजी पत्नीने म्हणजेच करूणा ताई यांनी या कठीण काळात त्यांना आधार द्यावा. नवरा- बायकोमध्ये भांडणे तर वरचेवर होत असतातच, पण शेवटी आपला पती साधा भोळा सदाशिवासारखा पत्नीव्रता आहे. याचा विचार करून या करुणाकराला स्मरावे, त्यांच्या पायावर प्राजक्ताची पांढरीशुभ्र आणि टपोरी फुले वहावी आणि अशा गरीब माणसाच्या पाठीशी उभे राहावे. अशी आमची मनापासूनची इच्छा आहे. तसेच ज्या गरीब आणि मुंबईमध्ये घर नसलेल्या लोकांना अकारण नाडले जाते, म्हणजे त्रास दिला जातो. अशा लोकांच्या सोबत आमची सदिच्छा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

## पक्ष्यांना रस्त्यावर खाद्य दिले जाऊ शकत नाही

### हायकोर्टाचे स्पष्ट मत

मुंबई, दि. १३ प्रतिनिधी

**राजधानी मुंबईतील कबुतरखाना बंदी प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात दाखल याचिकेवर आज पुन्हा सुनावणी पार पडली. या सुनावणीत सरकारच्या महाअधिवक्त्यांनी सरकारची, मुंबई महापालिका आणि याचिकाकर्त्यांनी देखील आपली बाजू मांडली. त्यानंतर, उच्च न्यायालयाने काही महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले असून कंट्रोल फिडींगला परवानगी देण्यापूर्वी सार्वजनिक आरोग्याचा विचार करावा, नागरिकांच्या हरकती मागवाव्यात. तसेच, महापालिका यासंदर्भात थेट निर्णय घेऊ शकत नाही, असे हायकोर्टाने स्पष्ट केले आहे.**



तूर्तास, कबुतरखान्यावरील बंदी न्यायालयाने कायम ठेवली आहे. उच्च न्यायालयाचे न्या. गिरीश कुलकर्णी आणि न्या.आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी संपन्न झाली. कबुतर खान्यासंदर्भातील सुनावणीत राज्याचे महाअधिवक्ता यांनी राज्य सरकारची भूमिका मांडली. मुंबईतील तज्ज्ञ समिती आणि त्यातील संभाव्य सदस्यांची यादी आज उच्च न्यायालयात सादर करण्यात आली. आरोग्य अधिकारी, टाऊन प्लॅनिंगशी निगडित अधिकाऱ्यांचा या समितीत समावेश असणार आहे. मागील सुनावणीत बंदीचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाईचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने कायम ठेवले होते. तसेच, ही कोंडी संपवणे राज्य सरकार आणि पालिकेचं काम असल्याचे सांगत नागरिकांच्या सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने तज्ज्ञांचं मत घेण्याचा सल्ला उच्च न्यायालयाने दिला होता. सार्वजनिक आरोग्याला प्राधान्य देणे आणि सर्व नागरिकांचे घटनात्मक हक्क लक्षात घेऊन समिती स्थापन करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या होत्या. दरम्यान, तज्ज्ञांची समिती आणि त्यातील संभाव्य सदस्यांची यादी आज उच्च न्यायालयाकडे सादर करण्यात आली. इम्युनोलॉजिस्ट आणि मायक्रोबायोलॉजिस्ट यांचा देखील समितीत असणार समावेश आहे.

सार्वजनिक आरोग्याला धोका न पोहोचवता ठरलेल्या जागी पक्षांना खाद्य घालण्यासंदर्भात राज्य सरकारची भूमिका महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी मांडली. त्यावर, आमच्यासाठी सार्वजनिक आरोग्य महत्त्वाचे आहे, असे उच्च न्यायालयाने म्हटले. दादर कबुतरखान्याकडून खाद्य घालण्याची मागणी आल्याचा पालिकेने खुलासा केला. त्यानुसार, सकाळी ६ ते ८ खाद्य देण्याचे विचाराधीन आहे. मात्र, स्वच्छतेची जबाबदारी त्यांची असेल, असेही मुंबई महापालिकेने म्हटले. तर, पक्ष्यांना कुठे खाद्य घालणार असा सवाल मुंबई उच्च न्यायालयाने पालिकेला केला. तसेच, पक्ष्यांना रस्त्यावर खाद्य दिलं जाऊ शकत नाही, असेही उच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

www.pmfby.gov.in

# प्रधानमंत्री पीक विमा योजना

UIN: IRDAN126RP0001V01201617

(भारत सरकार व महाराष्ट्र शासनाची योजना, एआयसी द्वारा लागू)

फसल बीमा कराओ सुरक्षा कवच पाओ

खरीप 2025

विविध नैसर्गिक आपत्तींमुळे नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्याच्या दृष्टिकोनातून राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. **खरीप हंगाम विमा योजनेतील पिके:** भात (धान), खरीप ज्वारी, बाजरी, नाचणी (रागी), मका, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग, तीळ, कारळे, कापूस व कांदा या अधिसूचित पिकांसाठी, अधिसूचित क्षेत्रातील शेतकऱ्यांना भाग घेता येईल.

महत्त्वाच्या बाबी

- अंतिम मुदत: १४ ऑगस्ट २०२५
- योजनेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याचा ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक आणि ई पीक पाहणी बंधनकारक आहे.
- अधिसूचित क्षेत्रात अधिसूचित पिके घेणारे सर्व शेतकरी या योजनेत भाग घेऊ शकतात.
- कर्जदार आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांना योजनेतील सहभाग ऐच्छिक आहे.
- ई पीक पाहणी व विमा घेतलेले पीक यात तफावत आढळल्यास विमा अर्ज रद्द होईल व भरलेला विमा हप्ता जप्त होईल.
- विमा अर्ज भरण्यासाठी प्रति शेतकरी सीएससी विभागास रुपये ४० मानधन केंद्र शासनाने निर्धारित करून दिले आहे. ते संबंधित विमा कंपनी मार्फत सीएससी विभागात दिले जाते त्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांचा विमा हप्ता व्यतिरिक्त इतर शुल्क सीएससी चालक यांना देऊ नये.
- एखाद्या अर्जदाराने बोगस किंवा फसवणूक करून विमा योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना पुढील किमान पाच वर्ष काळ्या यादीत टाकून शासनाच्या कोणत्याही योजनेचा लाभ मिळणार नाही.
- मंजूर नुकसान भरपाई अर्जदार यांचे आधार संलग्न बँक खात्यात थेट केंद्र शासन पोर्टलवरून जमा करण्यात येणार आहे.
- सर्व पिकांसाठी जोखीम स्तर ७० टक्के.

### उंबरठा उत्पादन

अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांचे उंबरठा उत्पादन हे मागील सात वर्षातील सर्वाधिक उत्पादनाची पाच वर्षांच्या सरासरी उत्पादन गुणिले त्या पिकाचा जोखीम स्तर विचारात घेऊन निश्चित केला जातो.

### विमा संरक्षणाच्या बाबी:

पीक पेरणी पासून काढणी पर्यंतच्या कालावधीत विविध नैसर्गिक घटक कीड व रोगांचा प्रादुर्भाव इत्यादी कारणांमुळे पीक कापणी प्रयोगाद्वारे येणारे सरासरी उत्पादन हे त्या महसूल मंडळासाठीच्या उंबरठा उत्पादनापेक्षा कमी आल्यास त्या महसूल मंडळामधील त्या पिकाचा विमा घेतलेल्या सर्व शेतकऱ्यांना समप्रमाणात नुकसान भरपाई मिळणार आहे.

### विमा योजनेत सहभागी होण्याकरिता शेतकऱ्याने काय करावे?

अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी पीक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यास या विमा योजनेत सहभाग बंधनकारक नाही. त्यासाठी शेतकऱ्याने विमा योजना भाग घेण्याच्या अंतिम दिनांक आधी किमान सात दिवस आधी संबंधित बँकेस विमा हप्ता न भरणे बाबत लेखी कळवणे गरजेचे आहे.

बिगर कर्जदार शेतकऱ्याने आपला ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक, ७/१२ चा उतारा, बँक पासबुक, आधार कार्ड आणि पीक पेरणीचे स्वयंघोषणापत्र घेऊन प्राधिकृत बँकेत विमा अर्ज देऊन व हप्ता भरून सहभाग घ्यावा. याशिवाय कॉमन सर्विस सेंटर (सीएससी) च्या मदतीने आपण विमा योजनेत सहभाग घेऊ शकता किंवा www.pmfby.gov.in या पोर्टलचे सहाय्य घेऊ शकता. भाग घेतलेल्या शेतकऱ्याने नंतर ई पीक पाहणी नोंद पूर्ण करावी

योजनेच्या माहितीसाठी संपर्क पीक विमा योजनेच्या अधिक माहितीसाठी किंवा नुकसान भरपाई माहितीसाठी केंद्र शासनाचे कृषी रक्षक पोर्टल हेल्पलाइन १४४४७ वर संपर्क करावा, किंवा संबंधित विमा कंपनी प्रतिनिधि, स्थानिक कृषी विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा

| जिल्हे | विमा कंपनी |
|---|---|
| अहिल्यानगर, नाशिक, चंद्रपूर, सोलापूर, जळगाव, सातारा, वाशिम, बुलढाणा, सांगली, नंदुरबार, परभणी, वर्धा, नागपूर, नांदेड, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, हिंगोली, अकोला, धुळे, पुणे, जालना, गोंदिया, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, भंडारा, पालघर, रायगड, यवतमाळ, अमरावती, गडचिरोली | एग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड |

अधिक माहितीसाठी QR Code स्कॅन करावा.

https://www.aicofindia.com/grievance-redressal

HO/25-26/1A/16

भारतीय कृषी बीमा कंपनी® | AGRICULTURE INSURANCE COMPANY OF INDIA LTD

मुंबई क्षेत्रीय कार्यालयः "लोक चेंबर्स", मरोळ मरोशी रोड, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००५९ | मुख्य कार्यालयः प्लेट B & C, ५ वा मजला, ऑफिस ब्लॉक १. ईस्ट किडवाई नगर, नवी दिल्ली-११००२३

ईमेल: pikvima@aicofindia.com, वेबसाईट: www.aicofindia.com | सीआयएन: U74999DL2002PLC118123, आयआरडीएआय: 126

aicofindialtd aicofindia aicofindia

कृषि रक्षक पोर्टल हेल्पलाइन १४४४७

*केवळ जाहिरात

* केवळ जाहिरात (योजनेच्या सर्व अटी व शर्ती लागू).

फसल हो या कृषि संपदा। बीमा सुरक्षा हमारा वादा ॥

विमा आग्रहाची विषय वस्तू आहे




सवलतींचे ०२ दिवस बाकी !

अभय योजने अंतर्गत मालमत्ता कर एक रकमी भरल्यास शास्तीवर ९०% सूट.

ही सवलत फक्त १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत लागू आहे.

चालू वर्ष २०२५-२६ करिता ३१ ऑगस्ट पर्यंत कराचा संपूर्ण भरणा करा आणि ५% सूट हमखास मिळवा.

E-Bill स्वीकारा, डिजिटल भरणा करा वेळ वाचवा, २% सूट घेऊन बचत वाढवा!

ऊर्जा बचत करा सौर शक्तीने, आणि करामध्ये घ्या २% सूट!

जल पुनर्भरणाचा अवलंब करा, २% सूट सहज मिळवा!

घनकचरा शास्त्रोक्त पद्धतीने हाताळा, सवलतीचं दार उघडा आणि करात २% सूट मिळवा!

कचऱ्याची शिस्तबद्ध विल्हेवाट करा, मिळवा २% करामध्ये सवलत हमखास!

डिजिटल युगात स्मार्ट निर्णय! पारंपरिक रांगा सोडा, PMC Tax App & Panvel Connect App वरून घरबसल्या कर भरा!

वेळ वाचवा, panvelmc.org वरून कर ऑनलाईन भरा आणि मालमत्ता करामध्ये सवलती मिळावा.

मंगेश चितळे
आयुक्त तथा प्रशासक,
पनवेल महानगरपालिका

## महत्त्वाचे

### श्री संताजी महाराज पतसंस्था अध्यक्ष पवार; उपाध्यक्षपदी अंजली आमले

**नाशिक ।** श्री. संताजी महाराज न पतसंस्था नाशिकचे सन २०२५-२६ या आर्थिक




वर्षाकरिता अध्यक्षपदी अविनाश प्रभाकर पवार तर उपाध्यक्षपदी अंजली विजय आमले यांची बिनविरोध निवड करण्यात आली. नूतन अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सहकार अधिकारी शैलेश पोतदार, पतसंस्थेचे संचालक डॉ. शरद महाले, अशोक कस्तुरे, नितीन महाले, उषाताई शेलार, मंदाकिनी क्षीरसागर व व्यवस्थापक रवींद्र पगार आदी उपस्थित होते.

### गणेशोत्सवाच्या निमित्ताने वारली चित्रसृष्टी कार्यशाळा

**नाशिक ।** गणेशोत्सवापूर्वी वारली चित्रशैली कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार दि.१६ व रविवार दि. १७ रोजी



स्वतंत्र एक दिवसीय कार्यशाळा होईल. सकाळी ११.३० ते दुपारी ४.३० या वेळेत दोन्ही दिवशी कार्यशाळा होतील. पत्रकार व वारली चित्रशैली तज्ज्ञ संजय देवधर मार्गदर्शन करतील. वारली चित्रशैली शिकून यंदाची गौरी, गणपती सजावट आगळीवेगळी करता येईल. गंगापूररोड व पाईपलाईन रोडजवळ डीजे रीवा मेडोज, सोमेश्वर - सातपूर लिंकरोड, सम्राट अपना घर शेजारी येथे ही कार्यशाळा घेण्यात येणार आहे. १० वर्षांवरील मुले, मुली, युवती व सर्व वयोगटातील कलाप्रेमी महिला, पुरुषांना सशुल्क प्रवेश मिळेल. आवश्यक सर्व साहित्य, नोट्स व सर्टिफिकेट देण्यात येईल. येताना पेन्सिल, पाण्यासाठी छोटा बाऊल, पॅड, जुना रुमाल हे साहित्य बरोबर आणावे. प्रवेश मर्यादित असून फोन करुन सोयिस्कर तारीख ठरवणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी ९४२२२७२७५५ या क्रमांकावर संपर्क साधून नावनोंदणी करावी असे आवाहन संयोजकांनीकेले आहे.

### ओझरखेड येथे जागतिक आदिवासी दिवस साजरा

**ओझरखेड ।** त्र्यंबकेश्वर तालुक्यातील ओझरखेड येथे जागतिक आदिवासी दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मुलवड फाटा ते आश्रम शाळा ओझरखेड येथेपर्यंत रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सूत्रसंचालन गोपाळ राऊत यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष काळू गवळी, प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा तालुकाध्यक्ष जयराम भुसारे, तुकाराम चौधरी होते. सर्वप्रथम आदिवासी महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. नंतर आदिवासी भागात वाजवल्या जाणाऱ्या घांगळ भक्ती, डाक भक्ती, कांबड नृत्य, तारपा नृत्य आदी आदिवासी वाद्यांचे सादरीकरण करण्यात आले. लहान मुलांचे आदिवासी परंपरेशी निगडीत सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी हेमराज पढेर, संतोष थोरात, सरपंच माया पढेर, रवींद्र चौधरी, लता पवार मुख्याधापक, संदीप पढेर, मनोज वाजे, सरपंच रुपाली गवळी यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### टाय अप क्लासेस संचालकांची शुक्रवारी महत्त्वाची बैठक

**नाशिक ।** जेईई व नीट या परिक्षांच्या मार्गदर्शनाची कोणतीही व्यवस्था सरकारने केलेली नाही. दिवसेंदिवस या परिक्षांची काठिण्य पातळी मात्र वाढत आहे. अकरावी व बारावी विज्ञानाच्या नियमित अभ्यासक्रमाचे स्वरूप आणि या परिक्षांच्या अभ्यासाचे स्वरूप पुर्णपणे वेगळे आहे. विद्यार्थ्यांची या परिक्षांची तयारी, क्लासेसमध्ये अत्यंत चांगली चांगल्या दर्जेदार पद्धतीने व खुप मेहनतीने केली जाते, तेव्हा कुठे या विद्यार्थ्यांची निवड होते. पालक स्वतःहून या कॉलेज-क्लासेस टायअपची निवड करतात व पैसे भरतात. गरिब विद्यार्थ्यांनाही प्रवेश दिला जातो. आदिवासी विकास विभागाने आदिवासी विद्यार्थ्यांचीही व्यवस्था केली आहे. असे असले तरी, छात्रभारती व काही संघटना या क्लासेसला विरोध करत आहेत. टाय अप क्लासेसच्या संचालकांचेही याबाबत काही म्हणणे आहे. कॉलेजेसच्याही काही अडचणी आहेत. या सर्व प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी, सर्व संबंधितांची एक महत्त्वाची मिटिंग ( बैठक ) येत्या शुक्रवारी १५ ऑगस्ट सकाळी ९ वाजता, शिंगाडा तलाव परिसरातील, नाशिक जिल्हा कोचिंग क्लासेस संचालक संघटना पीसीसीडीएच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस, सर्व टाय अप क्लासेसचे संचालक, टाय अप कॉलेजेसचे प्राचार्य, संस्थाचालक, ज्यांना या टाय अप क्लासेसचा त्रास होतो अशा सर्व व्यक्ती व संघटना यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन संघटनेचे अध्यक्ष जयंत मुळे, समन्वक अतुल पुराणिक, राज पवार, उपाध्यक्ष मुकुंद रनाळकर, विवेक भोर, अण्णासाहेब नरुटे, प्रतिभा देवरे, विद्या राकडे, पवन जोशी, रविंद्र पाटील, किशोर सपकाळे आदी पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा विभागातर्फे राज्याबाहेर शेतकऱ्यांचा अभ्यास दौरा संपन्न

राम सुरसे यांजकडून

**वावी ।** सोयाबीन पिकाविषयीचे माहिती व तंत्रज्ञान जाणून घेण्यासाठी कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) नाशिक विभागाचे वतिने राज्याबाहेर शेतकऱ्यांचा अभ्यास दौरा नूकताच संपन्न झाला. शेतकऱ्यांना सोयाबीन शेतीचे तंत्रज्ञान आत्मसात होण्यासाठी कृषी विभाग, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) मार्फत नेहमीच प्रयत्न केले जात असतात. राज्याबाहेर नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमात सिन्नर व इगतपुरी तालुक्या बरोबर जिल्ह्यातील एकुण ८ तालुक्यातील शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. भा.कृ.अनु.प.राष्ट्रीय सोयाबीन अनुसंधान संस्थान इंदौर (म.प)येथील तीन दिवसीय सोया अन्न प्रक्रिया आणि उप उत्पादन वापर या विषयावर प्रशिक्षण घेतले.सध्याच्या काळात सोयाबीन हे पीक प्रामुख्याने नाशिक जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात होत असल्याने शेतकऱ्यांना या पिकातून आर्थिक पाठबळ मिळावे तसेच शेतीला जोडव्यवसाय म्हणून सोयाबीन पासुन विविध पदार्थ तयार करता यावे यासाठी शेतकरी या प्रशिक्षणात सहभागी झाले होते. डॉ ए.पी.शर्मा प्रशिक्षण समन्वयक यांनी प्रशिक्षणाचे माहिती देऊन प्रोग्राम सुरू




> भा.कृ.अनु.प.राष्ट्रीय सोयाबीन अनुसंधान संस्थान इंदौर(म.प)येथे कृषी विभाग कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) मार्फत नाशिक जिल्ह्यातुन शेतकरी पाठवले होते. या प्रशिक्षण शिबिरात शेतकऱ्यांना सोयाबीनचे जास्त उत्पादन देणाऱ्या वाणांविषयी माहिती मिळाली आहे. तसेच सोयाबीन पासून भरपुर प्रकिया केलेले पदार्थ तयार होतात. प्रक्रिया उद्योगाच्या दृष्टीने सुद्धा हे प्रशिक्षण शेतकऱ्यांना फायद्याचे आहे.यापासून छोट्या प्रमाणात का होईना शेतकरी प्रक्रिया उद्योग सुरु करु शकेल याची खात्री आहे.
>
> **- अभिमन्यु काशिद, प्रकल्प संचालक, आत्मा, नाशिक**

केला. या प्रशिक्षणात डॉ मृणाल कुचलन बियाणे उत्पादक टेक्निशियन व डॉ बी यु दुपारे,कृषी विस्तार यांनी सोयाबीन उत्पादन पीकपद्धती,सोयाबीन बीज उत्पादन पद्धत यावर मार्गदर्शन केले.डॉ नेहा पांडे यांनी सोयाबीनचे आहारातील महत्व,बेकरी उत्पादन तसेच सोयाबीन पासून तयार होणारे प्रक्रियायुक्त पदार्थ याबद्दल सर्व माहिती दिली. प्रशिक्षण घेतेवेळी संस्थेच्या प्रक्षेत्रावर भेट देऊन लावण्यात आलेल्या नवनवीन वाणांची माहिती दिली.तसेच खत बियाणे औषधे, लागवड व काढणी याबद्दल सर्व माहीती शेतकऱ्यांना देण्यात आली. यावेळी शेतकऱ्यांनी उपस्थितांना प्रश्न विचारून शंका समाधान करुन घेतले.तसेच सोयाबीन वाण १५० या वाणाचे जनक डॉ अनिता राणी या विशेष करून उपस्थित राहिल्या. डॉ. राणी यांनी १५० या वाणा बदल माहिती दिली. डॉ. अनिता राणी यांसकडून उपस्थीतशेतकऱ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सहायक कृषी अधिकारी राहुल शिंदे यांनी सर्व शेतकऱ्यांना एकसंघ करत सुयोघ्य नियोजन करुन हा प्रशिक्षण कार्यक्रम पार पाडला. समारोपप्रसंगी पुरस्कारप्राप्त शेतकरी सुनील भिसे यांनी उपस्थितांचे आभार मानले.यावेळी जिल्ह्यातील ५० शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला.

सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन प्रकल्प संचालक नाशिक अभिमन्यू काशिद साहेब यांनी केले होते. यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी राहुल शिंदे, सोयाबीन शेती करणारे सिन्नर तालुक्यातील पुरस्कार प्राप्त शेतकरी सुनील भिसे,राधाकिसन भिसे, शुभम वाजे, कैलास दौंड,अनिल घुगे इगतपुरी तालुक्यातील गोकुळ जाधव, नाशिक तालुक्यातील नंदू कटाळे, हनुमंत मोरे आदी शेतकरी अभ्यास दौऱ्यासाठी उपस्थित होते.

> भा.कृ.अनु.प.राष्ट्रीय सोयाबीन अनुसंधान संस्थान इंदौर(म.प) येथे कृषी विभाग कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) मार्फत नाशिक जिल्ह्यातुन शेतकरी म्हणून मला पाठवले होते. या प्रशिक्षणाचा स्वतःसह ईतर शेतकरी यांस खुप चांगला फायदा होणार आहे.इंदौर येथे जास्त उत्पादन देणाऱ्या वाणांविषयी माहिती मिळाली तसेच प्रकिया युक्त पदार्थ बनवण्याची माहिती मिळाली.
>
> **- सुनील त्र्यंबक भिसे, महाराष्ट्र शासन शेतीनिष्ठ पुरस्कार प्राप्त शेतकरी, मोहता, सिन्नर**

## सिन्नरच्या पूर्व भागात चोरट्यांचा सुळसुळाट

### मोटर सायकलसह डाळींब उत्पादकांवरती चोरट्यांचे लक्ष

**वावी ।** सिन्नरचा पूर्व भाग हा गोदावरी उजवा तटकालवा व काही प्रमाणात कडवा कालव्याचे लाभक्षेत्रात येतो.परीणामी हा भाग बर्यापैकी ओलीताखाली आल्याने शेतकर्यांची पिके ही पाण्या अभावी जळण्याचे प्रमाण कमी झालेले आहे त्यात खोपडी पूरचारीचे पाण्याची भर पडल्याने परीसरातील पीके जोमात आहे. परीसरात चांगल्याप्रमाणात ऊस, मका, सोयाबीन, द्राक्षासह डाळींब पीके घेतली जातात. सध्य स्थीतीत अनेक शेतकर्यांची डाळिंब फळाची तोडणी चालू आहे तर काही फळे पक्वतेच्या स्थीतीत आहे. काही दिवसांपूर्वीच महाजणपूर शिवारातील बाळासाहेब गरड यांचे डाळींब फळाची चोरट्यांकडून चोरी करण्यात आल्याने परीसरातील डाळींब उत्पादक धास्तावलेले आहे. सध्य परीस्तीतीत डाळींबास भाजारभाव चांगले असल्याने चोरट्यांचे फावले आहे. महागडी खत औषधे फवारणी करूण उत्तम प्रतीचे बागा हे चोरटे लक्ष्य करत असल्याने परीसरातील उजणी येथील राम सुरसे, सोमनाथ शिंदे, सचिन शिंदे यांनी आपल्या डाळिंब बागा सिसिटीव्ही कॅमेर्याचे निगराणीत करत रात्रीचा डोळ्यात तेल घालून खडा पहारा करत आहे. दहिवाडी व उजणी येथीलच काही महाबाग कोपरगाव शिवारात गत काही दिवसांपूर्वी डाळींब फळाची चोरी करतांनी शेतकर्यांनी रंगेहात पकडले होते त्या मुळे शेतकर्यांना नाहक संरक्षणाचा खर्च वाढला आहे.

शनिवार दि. ९ रोजी मध्यरात्री उजणी येथील शेतकरी राजेंद्र नामदेव सापनर यांची बजाज कंपनीची प्लॅटीना मोटार सायकल MH 15 KF 3847 चोरट्यांनी चोरुण नेल्याने परीसरात शेतात वास्तव्य करत असलेले शेतकरी कमालीचे धास्तावलेले आहे. परीसरात एम. आय. डिसी. पोलीसांकरवी रात्रीची गस्त घालण्याची शेतकऱ्यांची मागणी होत आहे.

## स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत 'हर घर तिरंगा' अभियान





**सप्तश्रृंग गड ।** प.पू.ओम दत्त श्री ठाकूर महाराज माध्यमिक विद्यालय श्री सप्तशृंगी गड येथे महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव प्रवीण परदेशी यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार विद्यालयाची आदर्श विद्यार्थिनी वैशाली रमेश पवारच्या हस्ते सकाळी ध्वजारोहण करण्यात आले. मुख्याध्यापक शशिकांत देसले यांच्या मार्गदर्शनाने "हर घर तिरंगा" या अभियानाच्या प्रचार प्रसिद्धी साठी श्री सप्तश्रृंगड परिसरात प्रभात फेरी काढण्यात आली.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी "हर घर तिरंगा" या अभियानाचा प्रचार आणि प्रसिद्धी होण्यासाठी सदैव राखू तिरंग्याचा मान जगात आपली वाढेल शान, एकच नारा एकच ध्यान हर घर झंडा, हर घर झंडा, ध्वज उभारू घरोघरी, सडा रांगोळी घरोघरी हर घर तिरंगा, घर घर तिरंगा अशा घोषणांनी परिसरात जनजागृती केली. शालेय आवारात रांगोळी स्पर्धा, तिरंगा स्वाक्षरी अभियान घेण्यात आले. रांगोळी स्पर्धेचे परिक्षण आरोग्य अधिकारी दिप्ती गोसावी व प्रतिक्षा गोसावी यांनी केले. एक विद्यार्थी एक झाड उपक्रम अंतर्गत सामाजिक वनीकरण परिक्षेत्रचे वनपरिमंडळ अधिकारी सुदाम भोये यांनी विद्यार्थ्यांसमवेत राष्ट्रीय हरित सेना उपक्रम अंतर्गत शालेय आवारात जांभुळ, चिंच, कांचन, काजू या वृक्षांची लागवड केली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सतिष बोरसे, सीमा गांगुर्डे, प्रतिभा बोरस्ते, आकाश सोनवणे, अरविंद पवार, कैलास गवळी, वसतिगृह अधीक्षक गोरख भोये, निखिल पाटील यांनी परिश्रम घेतले. या संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन व नियोजन संजय ठोके यांनी केले.

## पिनाकेश्वर येथे तिसऱ्या श्रावणी सोमवारी भाविकांचा उत्साह

**नांदगाव ।** तालुक्यातील जातेगाव पिनाकेश्वर येथे तिसऱ्या श्रावणी सोमवारी सुमारे अडीच ते पावणेतीन लाख भाविकांनी दर्शन घेतले. जगद्गुरु शांतिगिरीजी महाराज यांच्या हस्ते महाअभिषेक पार पडला. बेल, भोपळे आणि पवित्र जल घेऊन आलेल्या सुमारे 70 हजार भाविकांमध्ये दोन हजार महिलांचा समावेश होता. पावसाअभावी अनेकांच्या पायांना इजा झाल्या असून डॉ. संतोष जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. दत्तात्रेय मोरे, डॉ. महेश देशमुख, डॉ. फिरोज मन्सुरी, डॉ. प्रदीप चौधरी, डॉ. अमोल उगले, डॉ. अलोक बिश्वास आदींनी उपचार केले. देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष अर्जुन (बंडू) पाटील, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर पवार, सचिव बाबासाहेब, कोषाध्यक्ष रामदास चव्हाण, विश्वस्त शरद पवार, शिवाजी वरपे, ज्ञानदेव चव्हाण, शिवाजी गायकवाड, गणेश गवंडर, अनिल शिंदे, कैलास तुपे यांच्या देखरेखीखाली कार्यक्रम पार पडला. पुणे येथील जनसेवा मित्र मंडळ, संजय नगर मित्र मंडळ छत्रपती संभाजीनगर यांनी मोफत चहा-पाणी व खिचडी भंडाऱ्याचे आयोजन केले. पोलीस निरीक्षक दिगंबर भदाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनि सुनील बडे, गावित, हवालदार भास्कर बस्ते, भरत कांदळकर, शिपाई परमेश्वर श्रीखंडे आदींसह दंगा रोधक पथक व होमगार्डांनी दक्षता घेतल्याने कार्यक्रम सुरळीत पार पडला.







## वाणिज्य पदवीधरांना करिअरच्या मोठ्या संधी : उल्हास बोरसे

**निफाड ।** वाणिज्य विद्या शाखेमधून शिक्षण घेतलेले विद्यार्थी हे उद्योग व्यवसाय, सहकार, बँकिंग लेखापाल, गुंतवणूकदार, कर सल्लागार, शेअर मार्केट, अकाउंट आदी क्षेत्रात यशस्वी होतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकडे मोठी क्षमता असते. त्यांनी कृषी बरोबरच अनेक व्यावसायिक संधी शोधून उद्योगधंदे उभारले पाहिजेत. ते चांगले उद्योजक निश्चित होतील. आपली आवड ही आपले करियर म्हणून निवडतांना प्रत्येकाने अंतर्मुख होऊन एक विचार करणे गरजेचे आहे तो म्हणजे, फक्त आवड महत्वाची नसून त्या आवडत्या कामात आपण स्वतः सर्वोत्तम आहोत का ? त्याला समाजाची मान्यता आहे का ? त्यातून आपल्याला योग्य अर्थाजन होईल का ? आणि बदलत्या काळानुसार स्वतः कष्ट करण्याची मानसिकता असेल तर आपण निश्चितच मोठ्या यशला गवसणी घालू शकतो. एवढेच नव्हे तर महाविद्यालयीन जीवनातील पहिले पाच वर्ष स्वतःचे करियर घडविण्यासाठी जे विद्यार्थी मेहनत घेऊन सतत प्रयत्नशील राहतील, तेच विद्यार्थी भविष्यातील पन्नास वर्ष आनंदाने जगतील, म्हणूनच आपले कार्य सर्वोत्तम करणे हाच यशाचा खरा राजमार्ग आहे असे प्रतिपादन नाशिक येथील सुप्रसिद्ध सीए उल्हास बोरसे यांनी केले.




मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात वाणिज्य मंडळ उद्घाटन प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य राहुल दवते, उपप्राचार्य डॉ. प्रवीण ढेपले, प्रा. नरेश सोनटक्के, डॉ. सुसान लॉरेन्शिया, डॉ. रोहिदास शिंदे, डॉ. महेश बनकर आदी उपस्थित होते. श्री बोरसे पुढे म्हणाले की, वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांनी पुस्तकी शिक्षणाला कृतीयुक्त अनुभवाची जोड दिल्यास ते लवकर आपल्या पायावर उभे राहण्यास सक्षम होतील. वाणिज्य विभागाची पदवी हा फक्त पाया असून त्यापुढील घेतलेले शिक्षणच खऱ्या अर्थी विद्यार्थ्यांना विविध व्यावसायिक संधी निर्माण करून देतात. ही गोष्ट कोणीही दुर्लक्षित करू नये. छोटी सुरुवात, सातत्य आणि परिपक्व व्यावसायिक दृष्टीकोन बाळगल्यास निश्चितच सर्वांना यशाची हमी मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे यांनी सांगितले की, मानवी इतिहासा इतकाच वाणिज्य व्यवहार जुना आहे. सध्याचे युग हे औद्योगिक प्रगतीचे, आधुनिक तंत्रज्ञानचे आहे. जागतिक बाजारेठेमुळे वाणिज्य शाखेमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या उत्तम संधी आहेत. विद्यार्थ्यांनी वाणिज्य शाखेतील विविध कोर्सेस पूर्ण केल्यास त्यांना शासकीय, निमशासकीय, सहकार क्षेत्र, खाजगी कंपन्या, सेवा क्षेत्र आदी क्षेत्रात देश आणि विदेशात विविध पद भरताना वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांचा आग्रक्रमाने विचार केला जाऊन त्यांच्या कर्तृत्वाला वाव आहे. म्हणून तुम्ही हुशार आणि प्रयत्नशील मित्रांची संगत करा म्हणजे तुम्हीही अधिक प्रयत्नवादी आणि हुशार व्हाल. गरीब गरीब होतो आणि श्रीमंत अधिक श्रीमंत होतो ही संकल्पना आपल्याला मोडायची आहे. हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा आपण श्रीमंत किंवा यशस्वी व्यावसायिक आणि आपल्यापेक्षा विचाराने आणि कृतीने मोठ्या मित्रांची सांगत करू. कारण आधुनिक विचार, व्यावसायिक दृष्टिकोन आपण आणि योग्य निर्णय आपल्या जीवनाला व करियरला नवीन कलाटणी देईल, असे मत व्यक्त केले. राहुल दवते म्हणाले की, निफाड महाविद्यालय शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा व सामजिक अश्या विविध प्रकारचे उपक्रम विद्यार्थी केंद्रबिंदू ठेऊन नियमित राबवित असते. यातून अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत आहे. निश्चितच यातून एक सक्षम पिढी घडत असल्याचे समाधान व्यक्त करून पुढील उपक्रमांना शुभेच्छा दिल्या. प्रा. नरेश सोनटक्के यांनी प्रास्तविकात वाणिज्य मंडळाचा उद्देश सांगून वर्षभर राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ऋचा जगताप यांनी केले तर आभार डॉ. प्रवीण ढेपले यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीततेसाठी प्रा. निकेतन महाले, प्रा. माधुरी थेटे, प्रा. दीपाली जगताप, प्रा. अविनाश पिंपरकर आदींनी परिश्रम घेतले.

## ➤ महत्त्वाचे

### डॉ. लहामटे यांची राष्ट्रवादीच्या आदिवासी सेलच्या राज्य उपाध्यक्षपदी नियुक्ती

**कावनई ।** सिन्नर मतदारसंघातील टाकेद गटातील आदिवासींसह इतर घटकांच्या न्यायहक्कासाठी सातत्याने लढा देणारे, महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे यांचे विश्वासू युवा नेते डॉ. श्रीराम



लहामटे यांची महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या आदिवासी सेलच्या राज्य उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. मुंबई येथील राष्ट्रवादी प्रदेश कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, त्र्यंबकेश्वर-इगतपुरीचे आमदार हिरामण खोसकर आणि देवळालीच्या आमदार सरोजताई अहिरे यांच्या हस्ते डॉ. लहामटे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. या वेळी जिल्हा अध्यक्ष विष्णुपंत म्हैसधुणे, प्रदेश सरचिटणीस गोरख बोडके, तालुकाध्यक्ष पांडुरंग वारूंगसे, डॉक्टर सेलचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष महेंद्र सिरसाट, जिल्हा उपाध्यक्ष गोपाळ पाटील, पक्षाचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तेजस बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे पुरस्कार जाहीर

**सिन्नर ।** येथील महाविद्यालयातील प्रा. संजय पवार यांना राज्यस्तरीय साहित्य भूषण पुरस्कार, प्रा. आर. टी. सोनवणे, प्रा. डी. एम. ढोली, प्रा. कैलास काळे, बाळासाहेब डावरे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.



यानिमित्त संस्थेचे सरचिटणीस अ‍ॅड. नितीन ठाकरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. यू. पाटील, संचालक कृष्णाजी भगत, उपप्राचार्य आर. व्हि. पवार, उपप्राचार्य प्रा. एस. पी. शेलार, एच.एस. सी. व्होकेशनल विभागाचे प्रा. गिरीष गुजराथी यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

### पाली भाषा अभ्यासकेंद्रांसाठी प्रस्ताव सादर करण्याचे मुक्तचे आवाहन

**नाशिक ।** नुकताच केंद्र सरकारकडून 'अभिजात भाषेचा' दर्जा मिळालेल्या पाली भाषेचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. विद्यापीठाच्या मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेतर्फे पाली भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात आला असून, यासाठी नवीन अभ्यासकेंद्रे सुरू करण्यासाठी प्रस्ताव मागवण्यात आले आहेत. करणाऱ्या नामांकित सामाजिक संस्थांना हा अभ्यासक्रम सुरू करायचा आहे, ते आवश्यक निकष पूर्ण करून प्रस्ताव सादर करू शकतात. प्रस्ताव सादर करण्यासाठी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावरील "YCMOU Study Centre Affiliation Proposal" या लिंकवर जाऊन आवश्यक माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज भरताना काही तांत्रिक अडचणी आल्यास, सुटीचे दिवस वगळता कामकाजाच्या दिवसांमध्ये दररोज दुपारी ३ ते ४ या वेळेत संकेतस्थळावर दिलेल्या गुगल मीट लिंकद्वारे ऑनलाइन बैठकीत सहभागी होऊन अडचणी सोडवता येतील. पाली भाषा अभ्यासकेंद्रासाठी मोठ्या संख्येने प्रस्ताव दाखल करावेत, असे आवाहन संचालक नागार्जुन वाडेकर यांनी केले आहे.

### मनमाडला अवयव दान जनजागृती प्रकल्पाचे आयोजन

**मनमाड ।** रोटरी क्लब ऑफ मनमाड मॅजिक आणि तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने अवयव दान जनजागृती प्रकल्पाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे उद्दिष्ट नागरिकांमध्ये अवयव दानाबाबत जनजागृती घडवून आणणे आणि समाजात सकारात्मक संदेश पोहोचवणे हे होते. या प्रसंगी तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष जगताप यांनी उपस्थितांना अवयव दानाचे महत्त्व, प्रक्रिया व त्यामागील वैद्यकीय व सामाजिक गरज याविषयी सविस्तर



माहिती दिली. त्यांनी सांगितले की, "अवयव दानामुळे अनेक गरजू रुग्णांना नवीन जीवन मिळू शकते. समाजामध्ये या विषयावरील गैरसमज दूर करून लोकांनी पुढे येणे गरजेचे आहे." यानंतर रोटरी क्लबच्या सर्व सदस्यांनी अवयव दानाची प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमात सर्व सदस्यांचे ऑनलाईन फॉर्म भरून अधिकृतपणे नोंदणी करण्यात आली. प्रकल्पाचे संयोजन कुणाल गायकवाड, लखन मोटवानी, रोटरी क्लब ऑफ मनमाड मॅजिकचे अध्यक्ष डॉ. रवींद्र सुर्वे, सचिव डॉ. सैफ काझी, सदस्य योगेश पाटील, अजय गवळी, आय्युब शेख, उमेश पाठक, हेमंत देशमुख, रामदास दुभासे, डॉ. नाझीम शेख, सौरभ थोरात, शुभम पगार, तैय्यब शेख आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

# 'हर घर तिरंगा' अभियान

## महापालिकेत रंगला सांस्कृतिक कार्यक्रम





**नाशिक ।** भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त भारत सरकारच्या "हर घर तिरंगा" अभियानाचा एक भाग म्हणून नाशिक मनपातर्फे मंगळवारी (दि. १२) सकाळी १० वाजता मुख्यालय राजीव गांधी भवन येथे भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

आयुक्त मनीषा खत्री यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त नितीन पवार, मनपा शाळांचे शिक्षक-विद्यार्थी, प्रबोधिनी विद्या मंदिर मतिमंद मुलांची शाळा, इतर शाळांचे शिक्षक-विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती लाभली. जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमात मनपा शाळा क्र. ७१, रायगड चौक, प्रबोधिनी विद्या मंदिर मतिमंद मुलांची शाळा, शायनिंग स्टार अकॅडमी इंग्लिश मिडीयम स्कूल व ज्युनियर कॉलेज, अभिनव आदर्श मराठी शाळा, नारायण बापूनगर, सायखेडा रोड यांच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर नृत्य सादर केले. याशिवाय, मनपा अधिकारी व कर्मचारी तसेच त्यांच्या पाल्यांनी देशभक्तीपर गीते, वाद्यवृंद, नृत्य व इंग्रजी भाषण सादर केले. कार्यकारी अभियंता रवींद्र बागुल, नगरसचिव विभागाचे सुरेश पवार, पंकज कु-हे, वामन पवार, कैलास दराडे यांनी देशभक्तीपर गीते सादर केली. देवांश तायडे यांनी इंग्रजी संभाषण, तर कृष्णा आडभाई यांनी गिटारवादनातून देशभक्तीपर गीते सादर केली. सर्व सहभागी शिक्षक, विद्यार्थी, कर्मचारी व त्यांच्या पाल्यांचा सत्कार कामगार सेनेचे अध्यक्ष सुधाकर बडगुजर, मनपा अधिकारी व कर्मचारी यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उपअभियंता दीपक मालवाल, बालाप्रसाद गाजुल, सहा. आयुक्त रमेश बहिरम, सहा. अधिक्षक शेखर चौरे, तसेच मनपा अधिकारी-कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली. "हर घर तिरंगा" अभियानाअंतर्गत नाशिक शहरात देशभक्तीचे वातावरण निर्माण करण्यासाठी नाशिक महानगरपालिकेने घेतलेला पुढाकार यशस्वी ठरत असून, शहरभर तिरंगामय उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# मनसे-ठाकरे सेनेचा १२ सप्टेंबरला संयुक्त मोर्चा

**नाशिक ।** ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, निधी असूनही शहराला प्राप्त झालेले बकाल रूप, शेतकऱ्यांची झालेली फसवणूक आदी विविध मुद्दे घेऊन शिवसेनेचा ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने येत्या १२ सप्टेंबरला संयुक्त मोर्चा काढण्यात येणार आहे. त्यासंदर्भात दोन्ही पक्षांची संयुक्त बैठक मनसेच्या राजगड कार्यालयात झाली.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत युतीबाबत अद्याप काही ठरले नसले तरी स्थानिक पातळीवर दोन्ही पक्षांचे नेते मात्र एकत्रच काम करीत असल्याचे चित्र आहे. येत्या १२ ऑगस्टला दोन्ही पक्षांच्यावतीने संयुक्त मोर्चा काढून पुन्हा एकदा ताकद दाखवून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. मोर्चा भव्य दिव्य होण्यासाठी काटेकोरपणे नियोजन केले जात आहे. दोन्ही पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची संयुक्त बैठक मनसेच्या राजगड कार्यालयात झाली. मोर्चा यशस्वी करण्यासाठी विधानसभा मतदारसंघनिहाय बैठका घेण्याचे ठरले असून तसे वेळापत्रक तयार करण्यात आले आहे. दोन्ही पक्षांचे वरीष्ठ पदाधिकारी या बैठकांमध्ये जाऊन मार्गदर्शन करणार आहेत. मोर्चा काढण्यामागचा हेतू, सुरूवात कोठून होणार आणि समाप्त कोठे होणार, घोषणाबाजी, जनजागृती आदी बाबींवर मार्गदर्शन केले जाणार आहे. जास्तीत जास्त नागरिकांना मोर्चात सहभागी करून घेण्याचा हेतू आहे. बैठकीस मनसेचे प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील, शहराध्यक्ष सुदाम कोंबडे, महिला आघाडीच्या सुजाता डेरे, माजी नगरसेवक सलीम शेख, बंटी कोरडे, संतोष सहाणे, योगेश दाबडे, धीरज भोसले, नितीन माळी, शैलेश शिरसाठ, ज्ञानेश्वर बर्डे, ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख डी.जी.सूर्यवंशी, महानगर प्रमुख प्रथमेश गिते, भारती ताजनपुरे, राहुल दराडे, सुनील जाधव, बाळासाहेब कोकणे, महेश बडवे, शैलेश सूर्यवंशी, दिलीप मोरे, वैभव ठाकरे, भैय्या मणियार, देवा जाधव, मसुद जिलानी, राहुल ताजनपुरे, ऋषी वर्मा आदी उपस्थित होते,

# मनमाड-पुणे बस पडली बंद; प्रवाशांचे झाले हाल..

**मनमाड ।** राज्य परिवहन महामंडळाच्या मनमाड आगाराची मनमाड - पुणे ही बस येथून मार्गस्थ झाल्यानंतर अवघ्या अर्ध्या तासात येवला बस स्थानकात बंद पडली. गाडीमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने ती पुढे जाऊ शकणार नाही असे चालक वाहकाने सांगितल्याने लांब पल्ल्याच्या या गाडीतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची मोठीच गैर सोय झाली.यामुळे प्रवाशांनी संताप व्यक्त केला.




गाडी क्रं.एमएच १४ बीटी ४२७७ ही मनमाड आगाराची मनमाड पुणे नियमित धावणारे बस बुधवारी पहाटे ५.१५ वाजता बस स्थानकातून निघाली. मात्र येवला बसस्थानकात पोहल्यानंतर गाडी बंद पडली. चालकाने बस सुरु करण्याचा बराच प्रयत्न केला. पण तांत्रिक बिघाड झाल्याने बस पुढे जाऊ शकणार नाही असे चालक वाहक आणि सांगितले. त्यामुळे या गाडीने कोप रगाव,शिर्डी,अहिल्यानगर,शिरूर,पुणे पर्यंत प्रवास करणारे प्रवाशांची मोठी गैरसोय झाली.

मागून आलेल्या वैजापूर - पुणे या गाडीमध्ये मनमाड बसमधील प्रवाशांना वाहकाने बसवून दिले. मुळात ही गाडी वैजापूर येतानाच प्रवाशांनी भरून आली होती. त्यात मनमाड बसच्या नादुरुस्त गाडीचा प्रवासाची भर पडली. अनेक प्रवाशांना जागाही मिळाली नाही. त्यामुळे जेष्ठ नागरिक, महिला लहान मुले यांची मोठी गैरसोय झाली. येवला येथून काही प्रवाशांनी येवला पुणे असे आरक्षण देखील केले होते. त्यांना देखील उभ्याने प्रवास करावा लागला. शिवाय गाडीला पोहोचण्यासही मोठा विलंब झाला. त्यामुळे बसमधील प्रवाशांना आणि थेट प्रवास करणाऱ्या पुण्यापर्यंत जाणाऱ्या प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. मनमाड डेपोची मनमाड पुणे बस अतिशय लोकप्रिय आहे मनमाड सह परिसरातील नागरिकांना तसेच येवला,कोपरगाव,शिर्डी येथून थेट पुण्यापर्यंत जाण्यासाठी या गाडीला प्रत्येक वेळी मोठ्या प्रमाणात गर्दि असते. लांब पडल्याची गाडी मनमाड बस आगाराने किमान नवीन गाडी सोडावी अशी अपेक्षा आहे. मनमाड आगाराला पाच नवीन बसेस मिळाले आहेत. लांब पडल्याच्या प्रवासासाठी या बसचा उपयोग प्रशासनाने करावा अशी मागणी होत आहे. मनमाड व आगराच्या काही बसेस मध्येच तांत्रिक बिघाडाने बंद पडून प्रवाशांची गैरसय होत असल्याच्या तक्रारी यापूर्वी आलेले आहेत.

# सुविधा उपलब्ध होत नाही तोपर्यंत चांदवडचे उपजिल्हा रुग्णालय बंद करावे

## दर्जा उपजिल्ह्याचा, सेवा मात्र प्राथमिक आरोग्य केंद्राची!



(विजय काळे यांजकडून)

**रेडगांव खुर्द ।** मुंबई आग्रा महामार्गावर सोग्रस मालसाणे येथे पाच दिवसांपूर्वी छोटा हत्ती या वाहनाने शाळकरी मुलांना धडक दिल्यानंतर एक विद्यार्थी मृत तर अकरा विद्यार्थी जखमी झाले होते. जखमींमध्ये तिघांची प्रकृती अजूनही चिंताजनक आहे. चांदवड पासून सात-आठ किलोमीटर अंतरावर हा भीषण अपघात झाला होता. मात्र या सर्व अपघातींना चांदवडच्या ट्रॉमा केअर सेंटर तसेच उपजिल्हा रुग्णालयात पुरेसे उपचार मिळू शकले नाहीत. बहुतांशी सर्वांना पिंपळगाव नाशिक मालेगाव या ठिकाणी हलवावे लागले. महामार्गावर चांदवडचे उपजिल्हा रुग्णालय रुग्णांसाठी कामी येणार नसेल तर हे रुग्णालय सर्व सुविधा जोपर्यंत उपलब्ध होत नाही तोपर्यंत कायमचे बंद करून टाकावे. असा तालुक्यातील जनतेचा संतप्त सूर ऐकावयास मिळत आहे.

चांदवड हे मुंबई आग्रा महामार्गावर वसलेले तालुक्याचे ठिकाण, तसेच जवळच रेणुकादेवी आणि राहुड या दोन ठिकाणी घाटमाथा परिसर असल्याने वारंवार अपघात होत असतात. मात्र रुग्णांना तात्काळ सेवा या उपजिल्हा रुग्णालयात कधीच मिळत नाही. किंवा या ठिकाणी तशी कोणतीही साधनसामग्री उपलब्ध नाही. या रुग्णालयात डायलिसिस, सिटीस्कॅन, एम आर आय, सोनोग्राफी, आयसीयू, ऑक्सिजन, अपघात विभाग, अशा कोणत्याच सुविधा या ठिकाणी उपलब्ध नाही. तसेच या संबंधीचे प्रशिक्षित डॉक्टरही उपलब्ध नाही. महिला प्रसूतीचे पेशंट सुद्धा इथे बऱ्याच वेळा घेतले जात नाही. त्यांना दुसरीकडे जाण्याचा सल्ला दिला जातो. सुविधाच नसतील तर रुग्णालय हवे कशाला? उगीचच कर्मचाऱ्यांच्या पगारावर शासनाचा पैसा हा खर्च होत आहे. तात्काळ सुविधा मिळाल्या तर अनेकांचे जीव वाचले असते. मात्र सामान्य जनतेच्या जीवांचे कोणालाही घेणे देणे नाही.

**चांदवडचे पुढारी म्हणजे 'सारागाव मामाचा एक नाही कामाचा'**

चांदवड तालुक्यात विविध राजकीय पक्षांचे पाटीभर पुढारी आहे. परंतु जनतेसाठी कार्यकर्तृत्वाचा विचार केल्यास 'सारागाव मामाचा एक नाही कामाचा' असाच प्रत्यय संपूर्ण जनतेला येत आहे. तालुक्याचे आमदार डॉ. राहुल आहेर हे तिसरी पंचवार्षिक निभावित आहे. परंतु त्यांना ट्रामा केअर आणि उपजिल्हा रुग्णालयात तसुभरही सुविधा देता आली नाही. सुविधा देण्यासाठी ते सपशेल अपयशी ठरले आहे. माजी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनाही त्यांच्या कालावधीत या रुग्णालयासाठी कवडीचेही काम करता आले नाही. सत्ताधारी पुढारी काम करत नसेल तर विरोधकांनी आवाज उठवला पाहिजे. परंतु चांदवडची गतच न्यारी आहे. इथे कोणी कधीही जनतेसाठी विरोधाची भूमिका घेत नाही. वैयक्तिक स्वार्थासाठी इथे सत्ताधारी आणि विरोधक भूमिका बजावतात. काँग्रेसचे माजी आमदार शिरीषकुमार कोतवाल आणि आमदार डॉ. राहुल आहेर यांच्यात जनतेच्या प्रश्नांवर उघडपणे फार कधी विरोध दिसत नाही. त्यांच्यात लुटूपुटुचा विरोध असल्याचे तालुक्याने बघितले आहे. दुसरे शरद पवार गटाचे माजी आमदार उत्तम भालेराव हे नेहमी जनतेपासून दूर असतात. बोलावणं आल्याशिवाय ते जात नाही. तर चांदवडची दुसरी फळी भावी आमदारकीसाठी पायात चाळ बांधून बसली आहे. यामध्ये भाजपाचे कृऊबाचे माजी सभापती डॉ. आत्माराम कुंभार्डे, उबाठाचे कृऊबा सभापती नितीन आहेर, शरद पवार गटाचे डॉ. सयाजीराव गायकवाड, माजी सभापती संजय जाधव या सर्वांची भूमिका बघ्याची असते. तर 'प्रहार'चे गणेश निंबाळकर हे एखादी सोयीची भूमिका घ्यायची या पलीकडे काही नाही. शिवसेनेचे भाऊसाहेब चौधरी अजून वह्या पुस्तके वाटण्याच्या पुढे जात नाही. फार तर शहरातला एखादा रस्ता मंजूर करणे, यापलीकडे काम नाही. माजी नगराध्यक्ष भूषण कासलीवाल यांची 'एकला चलो रे' ची भूमिका व शक्य होईल तेवढेच काम ते करतात. विविध राजकीय पक्षांची तिसरी फळी ही नेहमीच आपल्याला कुठे टक्केवारीवर काम मिळते, या डावात सतत मागोमागं फिरत असते. तर चौथी फळी ही हाय हॅलो आणि 'जिकडे घुगऱ्या तिकडे उदोउदो' करण्यात मग्न झालेली. मग जनतेच्या प्रश्नांवर लक्ष कोण देणार? त्यांची गा-हांनी कोण मांडणार? यामुळे चांदवडला कोणाच्याही हाती सत्ता द्या, परंतु येथील जनतेची अवस्था मात्र 'गरुडाच्या आसनावर कावळ्याची वर्णी' अशीच होते.

### दीड कोटीची इमारत दहा वर्षानंतरही बंदच

चांदवडला २०१५ मध्ये उपजिल्हा रुग्णालयाशेजारी दीड कोटी रुपये खर्चून ट्रामा केअर सेंटर ही इमारत उभी केली. तिचे उद्घाटन तत्कालीन जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, तत्कालीन सहकार राज्यमंत्री दादा भुसे, आमदार डॉ. राहुल आहेर यांच्या हस्ते झाले होते. मात्र दहा वर्षानंतरही ही इमारत बंदच आहे, इथं कोणत्याही सुविधा नाही, यंत्रसामग्री नाही. याकडे लक्ष द्यायला वेळ नाही. मात्र एखादा अपघात झाला की फक्त चमकोगिरी करायची आणि आम्ही कसे जनतेसाठी धावतो, हे दाखवायचे असाच प्रकार आजही सुरू आहे.

# नामको रुग्णालयात सुप्रा-मेजर शस्त्रक्रिया यशस्वी

## ७.५ किलोची गाठ काढून महिलेचा जीव वाचवला

**नाशिक ।** आदिवासी भागातील मध्यमवयीन महिला गेल्या काही दिवसांपासून पोटदुखी आणि भूक न लागणे या त्रासांनी त्रस्त होती. तिला नामको रुग्णालयात दाखल करण्यात आले. कॅन्सर सर्जन डॉ. अमोघ काळे यांनी तिची प्राथमिक तपासणी करून तिला पोटाची सोनोग्राफी व इतर काही तपासण्या करण्याचा सल्ला दिला. प्राथमिक सोनोग्राफीत या महिलेच्या पोटात एक भलीमोठी गाठ असल्याचे दिसून आले, ही गाठ कॅन्सरची असण्याची शक्यता गृहीत धरून या महिलेची पेट स्कॅन तपासणी करण्यात आली. पेट स्कॅन मध्ये तिच्या संपूर्ण पोटात गाठ पसरलेली होती, डाव्या किडनी पासून उद्भवलेली ही गाठ जवळपास ४० सेंटीमिटर लांब व ३० सेंटीमिटर रुंद एवढ्या मोठ्या आकाराची होती. या गाठीमुळे पोटाच्या पोकळीतील लहान आणि मोठे आतडे दाबले गेले व उजव्या बाजूला ढकलले गेले होते, तसेच डाव्या किडनीला गाठेने वेढले होते. याव्यतिरिक्त पॅन्क्रिया, प्लीहा आणि त्या आजूबाजूच्या रक्तवाहिन्यांचीही स्थिती बदलली होती. डाव्या किडनीला लागून असलेली गाठ आजूबाजूला महत्त्वाच्या अवयवांच्या जवळ असल्याने बायोप्सी करणे धोकादायक ठरले असते. त्यामुळे डॉ. अमोघ काळे आणि त्यांच्या शस्त्रक्रिया तज्ज्ञांच्या टीमने एक्सप्लोरेटरी लॅपरोटॉमी म्हणजेच पारंपारिक पद्धतीने उदरपोकळीला चिरा देऊन पोट उघडून त्यातून हि गाठ काढण्याची अवघड, गुंतागुंतीची शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. या शस्त्रक्रियेत रुग्णाच्या डाव्या किडनीला देखील कॅन्सरची लागण झालेली असे असे गृहीत धरून किडनी काढण्याची शक्यता व रुग्णाची संमती घेऊन तयारी देखील करण्यात आली. शस्त्रक्रियेदरम्यान उदर पोकळी उघडल्यानंतर गाठ मुख्यत्वे सॉफ्ट टिशू व फॅटी स्वरूपाची असल्याचे आढळून आले. तिने डाव्या बाजूचे



आतडे आणि संपूर्ण पचनसंस्था उजव्या बाजूला ढकलली होती. अत्यंत कुशलतेने कोणत्याही महत्त्वाच्या रक्तवाहिनी किंवा अवयवाला इजा होऊ न देता ७.५ किलो वजनाची ही संपूर्ण गाठ डिसेक्शन करून एका तुकड्यात काढून टाकण्यात आली आणि डावी किडनीही काढण्यात आली. साधारण दोन अडीच तास चाललेल्या या अवघड शस्त्रक्रियेमध्ये कमीतकमी चिरफाड करून अतिरिक्त रक्तस्त्राव होणार नाही याची परिपूर्ण काळजी डॉ.अमोघ काळे आणि त्यांच्या सहकार्यांनी घेतली होती. कॅन्सर सर्जन डॉ. अमोघ काळे, भूलतज्ञ डॉ. डॉ. भूषण वडनेरे, सर्जरी रजिस्ट्रार डॉ. योगेश गोसावी, डॉ. अवनी काळे, यांच्या संपूर्ण टिमने फिजिशियन डॉ. अभिजित सोनवणे, हृदयरोग तज्ञ डॉ. चेतन जैन, नामको हॉस्पिटलच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. विशाखा जहागीरदार, सी.एम.ओ. डॉ. अनिस शाह तसेच सुनील जाधव, यश वाघ यांच्या सहकार्याने ही शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली.

नामको हॉस्पिटलमध्ये सर्व प्रकारच्या मेजर व सुप्रामेजर शस्त्रक्रियेसाठी अत्याधुनिक सर्जरी कॉम्प्लेक्स तसेच सर्जिकल इन्स्ट्रूमेंट्स व इक्विपमेंट्सची उपलब्धता व डॉ.अमोघ काळे यांचे कौशल्यपूर्ण ज्ञान याच्या जोडीला शासकीय योजना यामुळेच अशा गंभीर शस्त्रक्रिया मोफत करणे शक्य होते असे नामको हॉस्पिटल विश्वस्त मंडळाने सांगितले.

# मुंबईची कबुतरे आणि दिल्लीचे भटके कुत्रे!

काही आठवड्यापासून राज्य सरकार आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या निदेर्शानुसार मुंबईतील सार्वजनिक ठिकाणी कबुतरखान्यांवरील कबुतरांना दाणे घालण्याऱ्यांवर महापालिकेने कारवाई सुरू केली आहे. या कारवाईमुळे सामाजिक, राजकीय असे अनेक मतभेद निर्माण झाले. तर आरोग्य तज्ञांनी कबुतरांच्या झपाटयाने वाढणा ?या संख्येवर आणि त्यांच्या पंख आणि विष्ठेमुळे माणसांना होणारे फुफ्फुसांचे आजार हे चिंताजनक कारण म्हटले आहे.

------------

मुंबईतल्या दादरमधील कबूतरखाना बंद करण्याच्या आदेशानंतर कबुतरांचा मुद्दा राज्यात चर्चित झाला आहे. जैन धर्माप्रमाणे कबुतरांना दाणे खाऊ घालण्याची पद्धत 'जीवदया' मानली जाते.

विद्यमान परिस्थितीत मुंबई आणि परिसरात पन्नासहून अधिक कबूतरखाने आहेत. जैन धर्माप्रमाणे कबुतरांना दाणे खाऊ घालण्याची परंपरा जुनीच आहे. मात्र कबुतरांची झपाट्याने वाढणारी संख्या आणि त्यांचे पंख आणि विष्ठेमुळे मानवी फुफ्फुसांच्या आजारांचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे हे प्रकरण उच्च न्यायालयात गेले आहे.

यावर उच्च न्यायालयाने मानवी आरोग्य हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा असल्याचे सांगत माणूस आणि प्राणी या दोघांच्या हक्कांमध्ये संतुलन राखणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. न्यायालयाने कबूतरखाने हटविण्याची कारवाई थांबविली आहे. मात्र दाणे घालण्याची परवानगी दिली नाही अर्थात बंदी कायम आहे.त्यामुळे कबुतरे दान्यांपासून वंचित आहे.

एकीकडे प्राणीमात्रांविषयी असलेल्या जीव दयेचा प्रश्न,तर जैन समाजाच्या भावनेचा प्रश्न, तर दुसरीकडे लोकारोग्याचा प्रश्न असा तिहेरी गुंता सोडविण्याचे कार्य न्यायालय, महापालिका प्रशासन,कबुतर प्रेमी, आरोग्य तज्ञ यांच्या समन्वयातून लवकरच सुटेल अशी अपेक्षा आहे. कबुतरांना दाणे खाऊ घालण्याच्या परंपरेला छेद न देता कबुतरांच्या वाढत्या संख्येचे नियंत्रण आणि कबुतरांच्या विष्टेमुळे मानवी श्वसनासंबधीच्या आजारांचा प्रश्न कसा सुटेल हे पाहणे महत्त्वाचे ठरते.





कबुतरांचा मुद्दा सध्यातरी मुंबई पुरता चर्चित असतांना देशाच्या राजधानी दिल्लीत भटक्या कुत्र्यांची वाढत्या संख्येमुळे व त्यांच्या उच्छादाने चचेर्ली जात आहे. भटक्या कुत्र्यांच्या उच्छादाच्या बातमीची दखल स्वतःसर्वोच्च न्यायालयाने घेतली आहे.

भटक्या कुत्र्यांना पकडून आठ आठवड्याच्या आत (शेल्टर होम) निवारा केंद्रामध्ये ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत. त्या पाठोपाठ राजस्थान मध्येही उच्च न्यायालयाने भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याचे आदेश दिले आहे. हे आदेश देत असताना सर्वोच्च न्यायालय म्हटले आहे की, कोणीही भटक्या कुत्र्यांचे शिकार होता कामा नये. सार्वजनिक क्षेत्रातून हटवलेली कुत्री निवारा केंद्रात सोडल्यानंतर पुन्हा रस्त्याला सोडू नये. शिवाय या कार्यवाहीत जे अडसर ठरतील, त्यांच्यावरही कायदेशीर कारवाई होईल असे न्यायालयाने स्पष्ट म्हटले आहे.

एका आकडेवारीनुसार आठ लाखांहून अधिक भटकी कुत्री दिल्ली व एनआरसी परिसरात आहे.तर देशात सहा कोटींहून अधिक भटकी कुत्रे आहेत.देशात प्रति सेकंदाला एक व्यक्ती कुत्रा चावल्यामुळे बळी ठरतो.तसेच रेबीजमुळे दर तीन तासात किमान दोन लोकांचा मृत्यू होतो. दररोज पंधरा हजार टनापेक्षा जास्त कुत्र्यांची विष्ठा आणि आठ दक्षलक्ष गॅलन लघवी रस्त्यावर आणि मोकळ्या मैदानात टाकली जाते. याकडे पर्यावरण व आरोग्याच्या दृष्टीने संकट म्हणून बघायला हवे.

आज प्राणी हक्कांच्या विषयामुळे भटक्या कुत्र्यांची निर्बिजीकरणास निर्बंध येतात. आपल्या सभोवतालं असंख्य जण पाळीव कुत्र्यांना मोकाट सोडून देतात. जी काही नियम बंधने आहेत त्यावर अंमलबजावणीचा अभाव दिसतो. अनेक श्वानप्रेमी भटक्या कुत्र्यांना सामूहिकरीत्या खाद्य पुरवितात अशांनी कुत्रा पालनाची हौस घरीच बाळगावी.



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
९१३०८३५४५८
shashikanttote1979
@gmail.com

भटके कुत्रे कळपाने राहून अनेकांवर आघात करीत असतात. याउलट पाळीव कुत्र्यांचे तसे नसते. हे सामाजिक भान आज सर्वांनी स्वीकारायला हवे.

भटक्या कुत्र्यांची समस्या ही केवळ राजधानी दिल्ली पुरती नसून आपल्या गल्ली, चाळी, बोळी, सोसायटी, पायवाट, महामार्ग, चौक, नाक्यावरची सुद्धा आहे.

भटक्या कुत्र्यांची झुंडी आपणास अनेक ठिकाणी बघायला मिळतात. येणाऱ्या जाणाऱ्यांवर अचानक हल्ला करतात. विशेषतः शाळेकरी मुले, दिव्यांग, महिलांना ही भटके कुत्रे लक्ष्य करतात.

दुचाकी, चारचाकी वाहनाच्या मागे धावतात.परिणामी अपघातही मोठ्या संख्येने होतात. अलीकडेच बिहारच्या गोपाळगंज येथील मनोरुग्ण महिलेवर रात्रसमयी तब्बल बारा कुत्र्यांनी हल्ला केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. शिवाय यासारख्या असंख्य बातम्या दररोज प्रसारमाध्यमातून वाचायला मिळतात.


आज भटक्या कुत्र्यांचा उच्छांद एवढा उच्चकोटीला गेला आहे की, शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांपासून तर उशिरा कामावरून परत येणाऱ्या लोकांपर्यंत भटकी कुत्री समूहाने हल्ला करतात. या घटना सोबतच त्यांच्या बद्दलची दहशत व शिवाय त्यांच्या मलमूत्रांमुळे पर्यावरणीय धोका वाढत आहे. तसेच आरोग्याच्या नवनव्या समस्या निर्माण करीत आहे.

याकडे कळीचा मुद्दा म्हणून बघण्यास हरकत नाही. करिता आज पाळीव प्राण्याच्या संदर्भात देशात एक राष्ट्रीय कायदा असायला हवा. जेणेकरून प्राणी हक्क आणि मानवी आरोग्य अबाधित राहील.

प्रश्न मुंबईच्या कबुतरांचा असो किंवा भटक्या कुत्र्यांचा तो शासन, प्रशासन, पशुप्रेमी, पर्यावरणवादी संस्थांनी, सुज्ञ नागरिकांनी समन्वयातून सोडवायला हवा. इथे न्यायालयाचा अमूल्य वेळ खर्च व्हायलाच नको!

# विकृतीवर घणाघात करणारी आशयघन कविता : अस्वस्थ

अस्वस्थ हा कवी कैलास भाले यांचा दुसरा दमदार कविता संग्रह आहे. त्यांनी अफाट दुःखाचा कटू अनुभव घेऊन त्याचा सत्त्वसार आपल्या कवितांमधून मांडला आहे. ह्यह्यमाज्याकडे सुखाने कायमची पाठ फिरवली! असं मनोगतात म्हणणारा हा मूल्यधर्मी कवी, वंचित, उपेक्षित, दुर्लक्षितांचं दुःख आपल्या कवितेच्या कवेत घेऊन त्यावर फुंकर घालतो ही बाब स्तुत्य आहे।





या कवीने अस्वस्थ होत अनेक प्रश्नांना वाचा फोडली आहे. जेव्हा सर्जनोत्सुक मन अस्वस्थ असतं, तेव्हाच दमदार कविता साकारत असते. लेखणी झुंजार बनत असते.

*झुंजार लेखणीला हरणे, कबूल नाही*
*झुंजार लेखलीला झुरणे कबूल नाही!*

(सूर्यकुलं पृष्ठ. ७०)

कैलास भाले झुंजार लेखणीचे धनी आहेत. त्यांनी आधी सगळ्यांचं भलं करून, मग आमचंही भलं कर असं म्हणणाऱ्या आपल्या विशाल मनाच्या आईचं कसदार, सत्त्वशील दूध पचवलं आहे. श्रमधर्मी बापाचे कष्ट त्यांना आठवत राहतात. कैलास भाले आपल्या कवितेतून मोठा आशय मार्मिकर्तने वाचकांसमोर ठेवतात. ह्यपहाटह्न कवितेत ते म्हणतात...

*तुला पाहून माझ्यात*
*नरत्व*
*आणि मला पाहून तुझ्यात*
*मादीत्त्व जागं होतं*
*तर मग चल ना*
*जातीभेदाची पहाट होण्याआधीच्या*
*त्या अंधारात...*

कवितेवर प्रतेक कवी कविता लिहितोच लिहितो.

*कविता-*
*ममतेचा पंख*
*गर्जनेचा शंख*
*बंडाचा डंख असते।*
*(ठिणगी पृष्ठ. ३)*

हे ठाऊक असल्याने कैलास भाले वेगळ्या धाटणीची, घुसमट अक्षरबद्ध करणारी कवी नावाची कविता लिहितो.

कैलास भाले नावाचा चिंतनशील कवी आपल्या शैलीत व्यक्त होतो. तो म्हणतो..

विस्तारित शहराच्या वळणासाठी
*रेखांकित भूसंपादनात,*
*मांगवाडा उध्वस्त होईल*
*पण कुत्र्यासाठी हातातल्या*
*काठीची, सँगिणी होवो*
*दुःख ओले झेलताना*
*मोडलेला माणूस उभा राहो.*

अशी अभिलाषा वंदनीय आहे.

चळवळ या कवितेत हा निर्भीड कवी मुखवटा लाऊन विद्रोही भाषण करून मोर्चेकऱ्यांना भडकवणाऱ्या नेत्याला अनावृत्त करत त्याचा मुखवटा टराटरा फाडून टाकतो! पोतराजला समज देत अंधश्रध्देला सुरंग लावतोः वाघ माती या विचार कविताही चिंतनीय आहेत. उकल या आशयघन कवितेत कवी म्हणतो..

तुझी भूतदया अशी की
*गाईला चारा टाकून तू*
*ठेवलं पाखरांना पाणी*
*कुत्र्याला भाकर टाकून*
*मुग्यांना साखर ठेवली*
*पण मग दलितांची घरं*
*गावाबाहेर कशी?*

अद्भुत भूतदयेचं भूत उतारत कवीचा हा प्रश्न खूप गहन आहे.

भाव कवितेत अडते, दलालांना अनावृत्त करत काटा आपला आणि तोल त्यांचा म्हणत अन्नदात्याची तरफदारी भक्कमपणे करतो. काळ्या रुळाला ठोकरून स्वातंत्र्य, समता, बंधुतेसह न्यायाचा जयघोष बुलंद करणारा हा जिंदादिल कवी आहे! भेसळखोरांच्या उरात धडकी भरवण्याचं काम शस्त्र असलेली विद्रोही कविताच करू शकते; हे पटऊन देणारा हा डंखबाज कवी आहे !! या आशयघन सत्त्वशील कवितेने विद्रोही कवितेच्या समृद्ध दालनात मोलाची भर घातली आहे.

*अंगारा, धुपारा यावर*
*विश्वास न ठेवता हे युग*
*मंत्र-तंत्र खोटे,*
*महा खोटा जादूटोणा*
*विज्ञानाच्या सोटयाने खोटे सारे हाणा*

(रणांगण पृष्ठ ३८)

असा मंत्रघोष करण्याचे विज्ञानयुग आहे. याचे या कवीला ज्ञान आणि भान आहे. पर्यावरण वाचवणे हे भूमीसाठी फायद्याचेच आहे अशी या चिंतनशील कवीची भूमिका आहे. आडदांड अंधारात उजेडाने तग धरावा म्हणून आपणच दान आणि दातृत्वाचे धनी बनले पाहिजे असं आवाहन कवीने केलंय. झेंडा, अण्णा, धाव या मर्मभेदक वास्तवतेच्या वेध घेणाऱ्या दमदार कविता आहेत.

परिवर्तन या कवितेत कवीने फार मोठा संदेश दिला आहे.

*ठेविले अनंते तैसेची राहावे*
*चित्ती असू द्यावे समाधान*
*या तत्वज्ञानाने बेचैन झालो तेव्हा*
*अंधारात जन्मलो तरी,*
*अंधारात मरणार नाही म्हणून*
*मूळ गाभ्यालाच हात घालून*
*अनुत्तरित प्रश्नांच्या शोधात*
*सोडली पायरी,*
*तर सुख-शांती-समाधानाचा प्रकाश*
*उत्तर बनून मलाच धुंडाळीत आला!*

ही कवितेवर अफाट प्रेम करणाऱ्या धेयधुंद कवीची अग्निधर्मी डंखबाज कविता आहे. कटी-मिठी, आलिंगन-चुंबनावर कविता करणाऱ्या, गुलछबू कवींना ती पचणार नाही.

थोर विचारवंत आ. ह. साळुंखे यांची पाठराखण हा या अग्नीची लाली मिरवणाऱ्या कवीला मिळालेला मोठा पुरस्कार आहे. विद्रोहाची, समतेची शंख गर्जना करणाऱ्या या कवीला भरभरून शुभेच्छा!



डी. बी. जगत्पुरिया
9860485398
मीरानगर, पडेगांव,
औरंगाबाद.

# 'गोपाळकाला' उत्सवाचे बदलते स्वरूप!

श्रीकृष्णाने व्रजमंडळात गायी चारतांना स्वतःची आणि सवंगड्यांच्या शिदोऱ्या एकत्र करून खाद्यपदार्थांचा काला केला आणि सर्वांसह ग्रहण केला. या कथेला अनुसरून पुढे श्रीकृष्ण जयंतीच्या दुसऱ्या दिवशी काला करण्याची आणि दहीहंडी फोडण्याची प्रथा पडली.

कालपरत्वे या प्रथेचे व्यावसायिकरण झाले आणि ठिकठिकाणी लाखांची बक्षिसे मिळवून देणाऱ्या हंड्या बांधल्या जाऊ लागल्या. आता नवरात्रीप्रमाणे दहिहंडी उत्सवही राजकारणी आणि धनदांडग्यांची मक्तेदारी झाली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या हंड्या इच्छुक उमेदवारांसाठी प्रचाराचे मोठे साधन ठरणार आहेत. त्यामुळे दहीहंडी पथकाकांडून यंदा भरघोस कमाई केली जाणार हे निश्चित आहे. दहीहंडीच्या व्यासपीठावरून राजकीय फटाके फुटण्याची शक्यताही यंदा नाकारता येत नाही.

जो अधिक रकमेची बक्षिसे लावेल त्याच्या दहीहंडीला मोठ्या प्रमाणात गर्दी तर दिसतेच शिवाय वृत्तवाहिन्या, लोकल केबल नेटवर्कवाले अशा ठिकाणी पहाटेपासून दबा धरून बसलेली पाहायला मिळतात. लोकांनी अधिक गर्दी करावी यासाठी याठिकाणी सेलिब्रिटीजनाही अतिथी म्हणून बोलावले जाते. त्यांच्याकडून नृत्य करवून घेतले जाते, चित्रपटातील संवाद म्हणण्यास सांगितले जाते.

काही तरुण मंडळी तर खास या सेलिब्रिटी मंडळींना पाहण्यासाठी गर्दी करतात. गोविंदा पथक येतात, मनोरे रचतात, मोठे साहस करून अगदी वरच्या थराला पोहोचलेली किशोरवयीन मुले जमलेल्या जमावाला अभिवादन करतात; मात्र खास सेलिब्रिटींना पाहण्यासाठी आलेल्या मंडळींचे या गोविंदा पथकांकडे लक्षही नसते.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

वृत्तवाहिन्या, केबल नेटवर्क यांचे कॅमेरेसुद्धा केवळ सेलिब्रिटींभोवतीच घुटमळत असतात. दहिहंडीला साहसी खेळाचा दर्जा देण्यासाठी राज्य सरकारच्या पुढाकारातून मागील काही वर्षांपासून मुंबईत प्रो कबड्डीच्या धरतीवर प्रो दहीहंडीचे आयोजन केले जात आहे. अर्थात याठिकाणी दहीहंडीच नसल्याने दहीहंडीच्या नावावर ती मानवी मनोऱ्यांची स्पर्धाच असले असेच म्हणावे लागेल.

दहीहंडी उत्सवाच्या दिवशीही पुन्हा हेच चित्र पाहायला मिळते. ज्या ठिकाणी दहीहंडीचा इव्हेन्ट बनवला जातो त्या ठिकाणी दहीहंडी केवळ नावाला उभी केलेली असते. अधिकाधिक थर लावा आणि तेव्हढ्या थरांसाठी नियोजित केलेली रक्कम घेऊन जा हा एकच कार्यक्रम याठिकाणी राबवला जातो. त्यामुळे याला उत्सव म्हणावे कि साहसी खेळाची प्रात्यक्षिके हाही एक प्रश्नच आहे.

राज्यसरकारने गोविंदा पथकांना लाखो रुपयांचे विमाकवच देऊन या मनोऱ्याच्या स्पर्धेला जणू प्रोत्साहनच देत असते.

आज सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून पुढे जात आहेत त्यामुळे दहीहंडीही यातून सुटलेली नाही. मुंबईत महिला गोविंदा पथकांची संख्याही वर्षागणिक वाढू लागली आहे. ज्या ठिकाणी महिला गोविंदा पथक हंडी फोडण्यास येतात अशा ठिकाणी बघ्यांची गर्दी जरा जास्तच झालेली पाहायला मिळते. यामध्ये आंबट शौकीनही असतात.

श्रीकृष्णाने बालगोपाळांसह हंड्या फोडून लोणी खाल्ल्याचे सर्वांनाच ज्ञात आहे; मात्र गोपिकांनी त्याकाळी असे काही केलेले नाही, त्यामुळे दहीहंडी उत्सवाकडे धार्मिक उत्सव म्हणून पाहायचे असेल, तर किमान महिलांच्या हंडीची तरी या उत्सवामध्ये गणना करू नका. श्रीकृष्णाचे सवंगडी विविध वर्णातील तर होतेच शिवाय त्यातील अनेक जण खूपच गरीब होते. आपल्या सवंगड्यासह आपलीही शिदोरी एकत्र करून सारे भेद नष्ट करून एकत्र येण्याचा मोलाचा संदेश श्रीकृष्णाने गोपाळकाल्याच्या माध्यमातून दिला आहे.

आज हिंदू धर्मामध्ये जातीपातीच्या नावाखाली, राजकीय पक्षभेदामुळे आणि वैचारिक भेदांमुळे विविध गट निर्माण झाले आहेत. आज जाहिराती, सिनेमा, वेब सीरिजच्या माध्यमांतून केले जाणारे देव-देवतांचे, महापुरुषांचे, इतिहासाचे विकृतीकरण याचे आपल्याला काहीच वाटत नाही. कोणीही उठते आणि हिंदूंच्या धार्मिक प्रथा परंपरांना अंधश्रद्धा म्हणून हिणवते.

पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे आपणच आपल्या महान संस्कृतीला विसरून परकीय संस्कृतीला जवळ करू लागलो आहोत. परिणामी आपलीच अपरिमित हानी होत आहे. भगवान श्रीकृष्णाच्या शिकवणीनुसार यंदा आपापसातील सारे मतभेद विसरून राष्ट्राच्या आणि धर्माच्या पुनरुत्थानासाठी एकत्र येण्याचा संकल्प करूया आणि खऱ्या अर्थाने गोपाळकाला साजरा करूया !

## वाचक लिहितात

### विरोधी पक्ष सक्षम असावा!

जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या आपल्या देशात द्विपक्षीय प्रणाली आहे एक सत्ताधारी व दुसरे विरोधी पक्ष. यांची निवड लोकांमधून निवडणूक आयोगाच्या मार्फत घेण्यात येणाऱ्या निवडणुकीतून होते. सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवणे, त्यांच्या चुकीच्या निर्णयावर बोट ठेवणे आणि जनहितासाठी आवाज उठवणे हे विरोधी पक्षाचे काम आहे.

सध्याची स्थिती पाहता विरोधी पक्ष केवळ आणि केवळ सत्ताधारी पक्षावर बिनबुडाचे आरोप करत आहे. राष्ट्रहिताच्या विरोधात बोलताना आणि वागताना दिसत आहे. देशाच्या सुरक्षेसाठी जीवावर उदार होऊन लढणाऱ्या सैनिकांविषयी अपमानास्पद विधाने केली जातं आहेत.

त्यांच्या राष्ट्रनिष्ठेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक केला जात आहे.

सध्या ईव्हीएम मशीनच्या संदर्भात सर्वात मोठ्या पक्षाचे नेते आणि ज्यांना राजकीय धुरंदर असे म्हटले जाते ते ईव्हीएम मशीन वर अक्षेप घेत आहेत. निवडणूक जिंकली की ईव्हीएम बरोबर आहे आणि ती हारली तर ईव्हीएम मुळेच हरली असे सर्वत्र सांगितले जाते.

देशात विरोधी पक्ष हा सक्षम असावा. विरोधी पक्ष सक्षम असल्यास सत्ताधारी जनहितासाठी दक्ष राहतात. विरोधी पक्षाचा वचक नसेल तर सत्ताधारी बेलगाम होऊ शकतात त्यामुळे काँग्रेससह मित्र पक्षांनी विरोधी पक्ष म्हणून सक्षमपणे काम करावे असेच जनतेला वाटते.

■ **लीना मकरंद गाडगीळ**
**पनवेल.**

### इस्लामिक आक्रमकांच्या कबरीचे जतन -सरकारी तिजोरीतून?

इस्लामिक आक्रमकांच्या कबरीचे जतन सरकारी तिजोरीतून केल्या जाते. या आशयाची बातमी एका वृत्तपत्रात वाचनात आली. भारतीय पुरातत्व सर्व्हेक्षण विभागाने २०१०-११ ते २०२४-२५ या १५ वर्षांच्या कालावधीत हिंदुंवर अत्याचारांचे प्रतीक असलेल्या देहलीतील ऐतिहासिक इस्लामिक वास्तुंवर कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला .अशी माहिती माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त झाली, असे त्यात नमूद केले होते. देशातल्या प्रत्येक नागरीकाला झोपेतून खडबडून जागे करणारी ही बातमी आहे. हा खर्च सर्वसामान्य व्यक्तीच्या करातूनच निश्चितपणे केला जातो. आपण या आक्रमकांच्या वास्तू जतन करण्यासाठी कर देतो का?

पुरातत्व सर्व्हेक्षण विभाग केंद्र शासनाच्या आधिन आहे. प्रत्येक प्रस्तावित खर्चाकरीता तरतूद करावी लागते, तेंव्हा प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या लक्षात ही तरतूद कशाकरता केली आहे, हा भाग आला नाही का? इस्लामी वास्तूंना, कबरींना कोट्यावधी रुपयांचे सहाय्य करणे हे धर्मनिरपेक्षते च्या व्याख्येत बसते का? ही सरकारची उदासीनता की, प्रशासकीय उदारीकरणाची निष्पत्ती आहे. भारतीय नोटेवर असलेल्या अशोक स्तंभासाठी गेल्या काही वर्षात एकही पैसा खर्च केला गेला नाही.

शिवाजी महाराजांच्या गडकोटांसाठी अशी कोट्यावधीची रक्कम कधीच एक रकमी दिली जात नाही. शिवाय त्या गडांवर कबरीच्या संरक्षणावर वारेमाप खर्च होतो आणि हा सर्व पैसा आपल्या कराच्या पैशातून दिला जातो. आपल्या अमरनाथ, कैलास यात्रेला आर्थिक सहाय्य किंवा सवलत मिळत नाही, पण मक्केसाठी मात्र निधी दिला जातो. चूक आपलीच आहे. आपणच आपले अधिकार मागण्यात कमी पडतो. पण आता शांत न बसता आपण जाब विचारलाच पाहिजे? तरच याला कुठे ना कुठे आळा बसेल. आपल्याकडे मंदिरांना भक्ताचा पैसा आपण वापरतो आणि मोगली आक्रमक यांच्या वास्तूंना आणि कबरीसाठी सरकारी पैसा मिळतो हेच या देशाचे दुर्दैव आहे. हा इतिहास आहे की, या आक्रमकांचे वारसदार त्यांचा वारसा पुढे चालू ठेवून पुढे लव्ह जिहाद, लॅंड जिहाद, हलाल सर्टिफिकेट सारखी समांतर व्यवस्था भारतीय अर्थव्यवस्थेला खिळखिळी करण्यासाठी तसेच कबरीचे उदात्तीकरण व्हावे यासाठी ते प्रयत्नरत आहेत. वक्फ कायदा जो हिंदुंच्या जिवावर उठला आहे, पुरातन मंदिर, शेती, जनतेची मालमत्ता वक्फ कायद्यांतर्गत ताब्यात घेतली जाते, हा जुलमी कायदा निरस्त करण्या बाबतचे काय?, हिंदू जनतेच्या संरक्षणाचे काय ? शेकडो शेतकरी आत्महत्या करतात आहे त्यांना द्यायला पैसा नाही .हे मुलभूत प्रश्न सोडविण्यापेक्षाही आतंकवाद्यांच्या कबरीचे संरक्षण महत्वाचे आहे का ? देशातील सर्व प्रश्न सुटले का ? असा प्रश्न आमच्या सारख्या सामान्य नागरिकांना पडतो. याचे उत्तर शासना कडून अपेक्षित आहे.

■ **शशिकांत पाध्ये, वर्धा.**

# हार्ट अटॅकपासून वाचण्यासाठी सोप्पा उपाय



तरुणांना कमी वयात हृदयविकाराने ग्रासलेले पहायला मिळत आहे. त्याच मुख्य कारण हाय कोलेस्ट्रॉल म्हटले जात आहे. हाय कोलेस्ट्रॉल वाढण्याचे सर्वात मोठे कारण अनहेल्दी आहार आणि शारिरीक निष्क्रीयता आहे.

लोक नेहमीच पिज्झा, बर्गर, चीझ, बटर, तेलकट पदार्थ, फ्राईड पदार्थ, रिफाईंड वस्तू, प्रोसेस्ड पदार्थ जास्त प्रमाणात खात आहेत आणि एक्सरसाईज करत नाहीत. त्यांच्यात हाय कोलेस्ट्रॉलची जोखीम खूप वाढली आहे.

अडचण ही आहे की हाय कोलेस्ट्रॉल वाढल्याचे आधी कळत नाही. तो हळूहळू हृदयाच्या धमन्यात वाढत असतो. आणि एकदिवस अचानक हार्ट अटॅक वा कार्डिएक अरेस्टचे कारण बनतो. अशात संशोधकांनी एक नामी उपाय शोधला आहे. जर रोज दोन अंडी खाल्ली तर हाय कोलेस्ट्रॉलची जोखीम खूप कमी होते. आणि अंततः यामुळे हार्ट अटॅकचा धोका कमी होतो.

**अंड्यांनी बॅड कोलेस्ट्रॉल वाढत नाही**

अमेरिकन जर्नल ऑफ क्लीनिकल न्यूट्रिशन प्रकाशित झालेल्या अहवालात सांगितले आहे की आधी अंडी खाल्ल्याने कोलेस्ट्रॉल वाढतो अशी धारणा होती. परंतू ती धारणा चुकीची आहे. वास्तवात अंड्यांना जर मर्यादित प्रमाणात खाल्ले तर याने हाय कोलेस्ट्रॉल कमीच होते. संशोधकांनी अखेर स्पष्ट केले की अंडी बॅड कोलेस्ट्रॉलची पातळी वाढवत नाहीत. अभ्यासात असे आढळले की हार्ट अटॅकसाठी हाय कॉलेस्ट्रॉलहून अधिक जबाबदार सॅच्युरेटेड फॅट जबाबदार असते.

हृदय रोग जगभरात मृत्यूचे प्रमुख कारण आहे. हृदयाच्या आजाराने दरवर्षी सर्वाधिक लोकांचा मृत्यू होतो. डब्ल्युएचओच्या मते दरवर्षी जगातील सुमारे २ कोटी लोकांचा मृत्यू होतो.भारतात जेवढे मृत्यू होतात त्यातील २५ टक्के मृत्यू हार्ट डिसीजने होतात.

**सॅच्युरेटेड फॅटमुळे हार्ट डिसिज**

जगात पहिल्यांदा साऊथ ऑस्ट्रेलिया यूनिव्हर्सिटीच्या संशोधकांना हे संशोधन केले की डाएटमध्ये असलेले कोलेस्ट्रॉल आणि सॅच्युरेटेड फॅच वेगवेगळ्या रुपाने बॅड कोलेस्ट्रॉल म्हणजे एलडीएला कसे प्रभावित करतात. जर कोणी रोज दोन अंडी खात असेल तर हार्ट डिसीजचा धोका कमीच होतो, कारण अंड्यात सॅच्युरेटेड फॅट कमी असते.

मुख्य संशोधक प्रो.जॉन बकली यांनी सांगितले की अंड्यांसंदर्भातील जुन्या आणि चुकीच्या समजूतीने त्यांना बदनाम केले गेले. परंतू अंडे अनोखे आहे. यात बेशक कोलेस्ट्रॉलचे प्रमाण जादा असते. परंतू यात सॅच्युरेटेड फॅट कमी असते. सॅच्युरेटेड फॅट कमी असल्याने ते हाय कोलेस्ट्रॉलला नियंत्रित करते.

या संशोधनात आम्ही कोलेस्ट्रॉल आणि सॅच्युरेटेड फॅटच्या परिणामांना वेग-वेगळ्या प्रकारे पाहीले आणि अंड्यातून मिळणारा अधिक आहार कोलेस्ट्रॉल, जेव्हा कमी सॅच्युरेटेड फॅट वाल्या आहाराच्या रुपात खाल्ला गेला, तेव्हा तो बॅड कोलेस्ट्रॉलची पातळी वाढवत नाही. ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### घरोघरी तिरंगा!

**विविधतेत एकता ही**
**भारताची शान आहे**
**धर्म पंथ भिन्न असुनही**
**'तिरंगा' निर्विवाद आहे ..**

**व्यक्तिपेक्षा पक्ष मोठा**
**पक्षापेक्षाही देश**
**या राष्ट्रनिष्ठेमुळेच**
**अखंडीत आहे प्रदेश..**

**तिरंगा मुळेच आम्हाला**
**जगात मिळतो आदर**
**त्याची प्रतिष्ठा भंग पावेल**
**असं वागू नको ब्रदर!**

# कांदा प्रश्नावर विरोधी खासदार आक्रमक

## संसदेसमोर कांदा माळा घालत निदर्शने; ५०० प्रती क्विंटल अनुदान हमीभाव देण्याची मागणी



**दिंडोरी ।** एकीकडे गुजरात राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान दिले जात असताना महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना अनुदान दिले जात नसल्याने राज्यातील महाविकास आघाडीच्या खासदारांनी एकत्र येत खासदार सुप्रिया सुळे यांचे नेतृत्वाखाली कांदा प्रश्नावर कांद्याच्या माळा गळ्यात घालत जोरदार घोषणाबाजी करत संसद परिसर दणाणून सोडत कांद्याला प्रती क्विंटल ५०० रुपये अनुदान, हमीभाव देण्याची मागणी केली आहे.

मंगळवारी (दि.१२) संसदेच्या मकर प्रवेशद्वारावर खासदार भास्कर भगरे, निलेश लंके यांनी सटाणा तालुक्यातील मोरेनगर येथील शेतकरी व्यंगचित्रकार किरण मोरे यांनी कांदा प्रश्नावर रेखाटलेले व्यंगचित्रं व गळ्यात कांदा माळ तसेच राजाभाऊ वाजे, शोभाताई बच्छाव यांच्यासह महाराष्ट्रातील खासदारांनी कांदामाळ घालत घोषणाबाजी केली. संपूर्ण देशासह सत्ताधाऱ्याचे लक्ष कांदा प्रश्नावर वेधून घेतले. नाफेड आणि एनसिसिएफच्या बोगस कांदा खरेदीचा पर्दाफाश करत निर्यातीला प्रोत्साहन व तसेच गुजरातप्रमाणे कांद्याला तात्काळ ५०० रुपये प्रति क्विंटल अनुदान देण्यात यावे आदी मागण्यांसाठी विरोधी खासदारांनी मागणी लावून धरली. संसद परिसर दणाणून सोडला.

गेल्या १०/१२ दिवसांपासून कांदा उत्पादक व्यंगचित्रकार किरण मोरे यांनी उत्तर महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींची व्यंगचित्रे रेखाटून निवेदनाद्वारे लक्ष वेधून घेतले होते, त्याची दखल घेत नाशिकसह उत्तर महाराष्ट्रातील खासदारांनी घेऊन खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन केले. यात खासदार डॉ शोभा बच्छाव, भास्करराव भगरे , राजाभाऊ वाजे, डॉ. अमोल कोल्हे बजरंग सोनवणे, निलेश लंके, अरविंद सावंत आदी महाविकास आघाडीचे खासदार सहभागी झाले होते.

> अवकाळी पावसाने कांद्याचे मोठे नुकसान झाले. कांद्याचे भाव रोज गडगडत आहे उत्पादन खर्च ही निघत नसल्याने कांदा उत्पादक हवालदिल झाले आहे.कांदा प्रक्ष्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. केंद्र सरकार या बाबतीत उदासीन असल्याचे दिसून येत आहे, गुजरात सरकारने कांद्यासाठी ३०० रूपये प्रति क्विंटल अनुदान जाहीर केले , ते महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना का नाही? तरी तात्काळ सर्व कांदा उत्पादकांना रु.५०० प्रति क्विंटल अनुदान द्यावे. नाफेड मार्फत बाजार समितीत कांदा खरेदी व्हावी.
>
> **- भास्कर भगरे खासदार दिंडोरी**

> नाफेड कांदा खरेदीत परप्रांतीयांच्या सुळसुळाट झाला आहे,गोवा, गुजरात, मध्यप्रदेश, येथील नाफेडचे दलाल, एजंट यांनी दिल्ली दरबारी अधिकाऱ्यांना सोबत घेऊन नाफेड व एनसिसिएफसाठी बोगस कांदा खरेदी केली आहे,२७ जुन पर्यंत सर्व खरेदी बंद झाली मग यांच्या भव्य मोठ्या खळ्या मध्ये कांद्याच्या वाहनांची गर्दी कशी? नाफेड आणि एनसिसिएफचा भ्रष्टाचार उघडकीस आला पाहिजे कांदा उत्पादकांना न्याय मिळाला पाहिजे.
>
> **- कुबेर जाधव नेते, स्वाभिमानी शेतकरी संघटना**

> संसदेच्या पावसाळी अधिवेशनात उत्तर महाराष्ट्रातील सर्वच खासदारांनी एकजुटीचे कांदा प्रश्नांवर आवाज उठवला त्याबद्दल सर्वांचे आभार. सरकारने कांदा उत्पादकांना न्याय द्यावा.
>
> **- किरण मोरे व्यंगचित्रकार, कांदा उत्पादक सटाणा**

# सिटीलिंकला त्र्यंबकराजा पावला

## तिसऱ्या श्रावण सोमवारी सुमारे ४४ लाखांचे विक्रमी उत्पन्न



**नाशिक ।** बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर म्हणजे लाखो शिवभक्तांचे श्रद्धास्थान. अशातच सध्या श्रावण महिना सुरु असल्याकारणाने लाखो शिवभक्त त्र्यंबकराजाच्या चरणी नतमस्तक होत असतात. श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारला विशेष महत्व असून यादिवशी त्र्यंबकेश्वर याठिकाणी पायी फेरी मारल्याने घडलेल्या पापांपासून मुक्ती होते असा भाविकांचा विश्वास असल्याने लाखो भाविक तिसऱ्या श्रावण सोमवारी त्र्यंबकनगरीत दाखल होत असतात.

याच शिवभक्तांच्या सोयीकरिता सिटीलिंकच्या वतीने रविवार तसेच सोमवार असे दोन दिवस नियमित बस फेऱ्याबरोबर जादा बसेसचे नियोजन करण्यात आले होते. याच बससेवेच्या माध्यमातून त्र्यंबकराजा सिटीलिंकला पावला असून सिटीलिंकला आजपर्यंतचे विक्रमी उत्पन्न प्राप्त झाले आहे. सिटीलिंकला सोमवार दिनांक ११ ऑगस्ट २०२५ एकाच दिवशी तब्बल ४४,०८,९४५/- इतके सर्वाधिक विक्रमी उत्पन्न प्राप्त झाले आहे.

सोमवार दिनांक ११ ऑगस्ट २०२५ रोजी विविध मार्गांवर नियमित व जादा अश्या एकूण सुमारे २४३९ बसफेऱ्या करण्यात आल्यात व या बसफेऱ्यांचा सुमारे १,१३,९१३ प्रवाश्यांनी लाभ घेतला. व याच माध्यमातून सिटीलिंकला तब्बल ४४,०८,९४५/- इतके सर्वाधिक विक्रमी उत्पन्न प्राप्त झाले आहे. यापूर्वी २०२३ च्या श्रावण महिन्यात म्हणजेच दिनांक ०४ सप्टेंबर २०२३ रोजी सर्वाधिक ३५,३६,८६७ /- इतके सर्वाधिक उत्पन्न प्राप्त झालेले होते. २०२३ नंतर थेट सोमवार दिनांक ११ ऑगस्ट २०२५ रोजी हा २०२३ चा विक्रम मोडत काढत तब्बल ४४,०८,९४५/- इतके सर्वाधिक उत्पन्न प्राप्त झाले आहे. एकूणच विक्रमी उत्पन्नाच्या माध्यमातून त्र्यंबकराजा सिटीलिंकला पावला असून सिटीलिंक बससेवेचा लाभ घेतलेल्या शिवभक्त व नियमित प्रवाश्यांचे सिटीलिंकच्या वतीने आभार व्यक्त करण्यात येत आहे. प्रवाश्यांनी दाखविलेला असाच विश्वास यापुढेही सिटीलिंकवर कायम ठेवावा, असे आवाहन सिटीलिंकच्या वतीने करण्यात आले आहे.

# खासगी मार्केट कमिटीची डिजिटल पावती बंद करण्याची मागणी

## शेतकरी संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**नाशिक ।** नाशिक जिल्ह्यातील खासगी मार्केट कमिटीमधून डिजिटल नको तर प्रिंटिंग पावती मिळावी, असे मागणीचे निवेदन अपर जिल्हाधिकारी यांना शेतकरी संघटनेच्या वतीने देण्यात आले.

जिल्ह्यातील खासगी मार्केट कमिटीतून डिजिटल पावती शेतकऱ्यांना दिली जाते. त्यातील मजकूर हिशेब एक महिन्यानंतर डिजिटल पावतीवरील अक्षरे पुसून जातात. शेतकऱ्यांना हिशेब पुरावा राहतं नाही. याबाबत अनेक शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत. हिशोब पावती शासनाचे अनुदान मिळवण्यासाठी पुरावे म्हणून प्रिंटिंग पावती मिळावी. डिजिटल पावती शेतकऱ्यांना नको आहे. प्रिंटिंग पावती शेतकऱ्यांना मिळावी. जिल्ह्यातील खासगी मार्केट कमिट्यांमधून डिजिटल पावती देणे बंद न केल्यास शेतकरी संघटनेतर्फे आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. यावेळी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अर्जुन बोराडे, संदीप सोनवणे, प्रवीण जाधव, मधुकर हाबरे, एकनाथ धनवटे, सुरेश शिरसाट, नंदकुमार जहागीरदार, दत्तात्रय कडलग, बाळू नाटे, शंकर ढिकले, किसन शिंदे, दत्तू थोरात, रामनाथ ढिकले, सोपान कडलग, कचरू बागुल, देविदास आहिरे व जिल्ह्यातील शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संघजन प्रतिष्ठानच्या स्नेहसंमेलनात जुन्या आठवणींना उजाळा




**नाशिक ।** संघजन प्रतिष्ठानतर्फे अशोक स्तंभ येथील राणी लक्ष्मीबाई सभागृहात रविवारी सायंकाळी स्नेहसंमेलन रंगले.

राष्ट्रसेविका समितीच्या चतुर्थ प्रमुख संचालिका आणि राणी लक्ष्मीबाई स्मारक समितीच्या भूतपूर्व अध्यक्षा प्रमिलाताई मेंढे यांचे नुकतेच गेल्या महिण्यात वयाच्या ९७ व्या वर्षी निधन झाले. संमेलन स्थळी त्यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांना संघजन प्रतिष्ठानच्यावतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. संमेलनात भाजपचे ज्येष्ठ नेते व संमेलनाध्यक्ष विजय साने यांनीमनोगत व्यक्त करताना म्हटले की, भाजप हा आपला परिवार आहे. या परिवारातील कार्यकर्त्यांबद्दल आठवणी तसेच भाजपा पदाधिकारी, आमदार, खासदार यांनी वेळोवेळी केलेले सहकार्य यांचे सुखद अनुभव अत्यंत भावनिक होऊन सांगितले. त्यासोबत अभय छल्लाणी, सुनील आडके, योगेश भगत, प्रदीप पाटणकर, प्रकाश दीक्षित आदींनीदेखील जुन्या आठवणींना उजाळा देत आपले अनुभव, किस्से सांगितले. एकोपा वाढणे, एकमेकांशी संबंध दृढ होणे, मैत्री, विश्वास निर्माण होणे या सारख्या गोष्टी संमेलनातुनच साध्य होतात व सर्वांनी एकजुटीने रहावे, असे विजय साने यांनी सांगितले. राज्य परिषदेवर संघजन प्रतिष्ठानचे अभय छल्लाणी, योगेश भगत, सुजाता करजगीकर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी साने यांचा सत्कार प्रतिष्ठानचे ज्येष्ठ सदस्य मधु दीक्षित यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. भाजपचे नाशिक शहराध्यक्ष सुनील केदार, सुनील आडके, माजी महापौर सतीश कुलकर्णी, महेश हिरे यांचा सत्कार करण्यात आला. प्रदीप पाटणकर यांनी राज्य परिषद सदस्यांच्या सत्कार केला. संमेलन यशस्वी करण्यासाठी सुहास चिपळुणकर, नरेंद्र सोनवणे, प्रकाश कुलकर्णी, वासुदेव रोहनकर, प्रकाश जेजुरकर यांनी सहकार्य केले संमेलनास संघजन प्रतिष्ठानचे सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते.

## ➤ महत्त्वाचे

### खेडोपाडी ग्रंथालय चळवळ उभी राहावी : डॉ. ज्ञानोबा ढगे

**निफाड ।** खेडोपाडी गाव तेथे ग्रंथालय आणि शहरात कॉलनी तेथे ग्रंथालय उभी राहिली पाहिजे. शासन आणि समाजाने ग्रंथालय हे समाजाची



अत्यावश्यक गरज आहे हे समजून ग्रंथालय उभारणीसाठी पुढाकार घेतला पाहिजे, असे मत प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे यांनी व्यक्त केले. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालयात ग्रंथालय विभागातर्फे नामवंत ग्रंथपाल व शिक्षण तज्ञ पद्मश्री डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा केला, त्याप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर ग्रंथपाल प्रा. दीपाली शेंडे, प्रा. रवींद्र मत्सागर, प्रा. भाऊसाहेब मुंतोंडे, प्रा. चित्रा कापसे, संध्या केदार आदी उपस्थित होते. डॉ. ढगे पुढे म्हणाले की, ग्रंथालय हे समाजात ज्ञानाचा दिवा प्रज्वलित करत असतात. सुसंस्कृत समाजात वाचन संस्कृती रुजवावी आणि वाढवावी, यासाठी आपले महाविद्यालयातील ग्रंथालय सदैव तत्पर आहे. पुस्तके माणसांना जोडतात, पुढे यातूनच ज्ञानसंपन्न पिढी घडते आणि देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी ते महत्त्वाचे असते, असे प्रतिपादन त्यांनी केले. ग्रंथालय विभागप्रमुख प्रा. दिपाली शेंडे यांनी त्यांच्या प्रास्ताविकात डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जीवन कार्याची माहिती दिली व ग्रंथपाल दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. सूत्रसंचालन प्रा. भाऊसाहेब मुंतोंडे यांनी केले, तर आभार ग्रंथपाल प्रा. आर. एम. मत्सागर यांनी मानले. प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांनी पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.


### विचारांमध्ये जग बदलण्याची ताकद : प्रा.डॉ. नारायण पाटील

**नाशिक ।** समाजाच्या संपन्न वाटचालीसाठी आधुनिक आणि पुरोगामी विचारांची आवश्यकता असते. कुठलीही क्रांती विचारांनीच होत असल्याने अशा विधायक विचारांमध्ये जग बदलण्याची ताकद असते, असे प्रतिपादन प्रा.डॉ.नारायण




पाटील यांनी केले. गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त हुतात्मा स्मारकात आयोजित 'पुस्तकावर बोलू काही' या उपक्रमात 'शोध डॉ.शाम मानवांचा' या पुस्तकावर १७१वे पुष्प गुंफताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी आ.नानासाहेब बोरस्ते होते. प्रा.डॉ.नारायण पाटील पुढे म्हणाले की, समाजाला जागृत करण्यासाठी वाचन आवश्यक आहे. वैज्ञानिक जाणिवा मानवी मनाचा वेध घेतात. साहित्यातून वैचारिकतेत वाढ होते. अंधश्रद्धानिर्मूलक साहित्यातून मानवी मूल्यांचे महत्त्व वाढते. असे विधायक विचार मांडणारे लेखन करून सामाजिक परिवर्तनासाठी डॉ.शाम मानव यांनी जनजागृती केली. स्वतःच्या घरावर तुळशिपत्र ठेवून त्यांनी समाज जागृतीचा वसा घेतला. आपल्या कार्याशी ते आयुष्यभर प्रामाणिक राहिले. मानसिक आरोग्य ढासळलेल्या अनेकांना त्यांनी जगण्याची दिशा दिली, असेही ते म्हणाले डॉ.सुषमा दुगड आणि प्राचार्य डॉ.वेदश्री थिगळे यांना ग्रंथभेट देण्यात आली. सुरेश पवार यांनी सूत्रसंचालन आणि मधुकर गिरी यांनी आभार मानले. दरम्यान येत्या शुक्रवारी (१५) सुप्रसिद्ध कवी दिलीप पाटील 'दुरून कुठून तरी' या पुस्तकावर ऐसपैस गप्पा करणार आहेत.

# पालकमंत्रिपदाच्या तिढयाला केवळ सामोपचाराची मल्लिनाथी




महायुतीच्या तीनही घटक पक्षांनी नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्रिपद अस्मितेचे केल्याने याबाबत निर्माण झालेला तिढा सुटण्याऐवजी अधिकाधिक घट्ट होत आहे. परिणामी बिनपालकमंत्र्यांचा जिल्हा अशी नाशिकची सर्वदूर ओळख झाली असून, विकास ठप्प झाला आहे. येऊ घातलेल्या स्वातंत्र्यदिनी अधिकृत पालकमंत्र्यांऐवजी कोणाला तरी तात्पुरत्या मान देऊन त्यांच्या हस्ते ध्वजारोहण उरकावे लागणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री केवळ लवकरच सामोपचाराने पालकमंत्रिपदाचा तिढा सुटेल, अशी मल्लिनाथी करताना अप्रत्यक्षपणे पालकमंत्रिपदाचा दावा करताना तिढा अधिकाधिक घट्ट करीत आहे, असे कुणी वक्तव्य केल्यास ते चुकीचे ठरणार नाही.

राज्यात ट्रिपल इंजिनचे सरकार सत्तेवर येऊन जवळपास दहा महिन्यांचा कालावधी लोटला आहे. तरीही नाशिकच्या पालकमंत्रिपदाचा प्रश्न मार्गी लागू शकलेला नाही. मलईदार जिल्हा आणि आगामी होऊ घातलेला सिंहस्थ कुंभमेळा या पार्श्वभूमीवर पालकमंत्रिपद खूपच वलयांकित झाले आहे. जिल्ह्यात सर्वाधिक आमदार राष्ट्रवादीचे (अजित पवार) आहेत. त्यामुळे राष्ट्रवादीने पालकमंत्रिपदासाठी भरभक्कम दावा ठोकला होता. शिवसेनेचे (शिंदे गट) दोनच आमदार असले तरी गेल्या वेळेस पालकमंत्रिपद सेनेच्या दादा भुसे यांच्याकडे होते. त्यामुळे सेनेने हक्कपूर्ण आणि हट्टपूर्ण दावा केला होता, आहे. इकडे भाजपला कोणत्याही परिस्थितीत नाशिकचे पालकमंत्रिपद सोडायचे नसल्याने भाजपने अप्रत्यक्षपणे दावा ठोकताना तिढा घट्ट करण्यास चांगला हातभार लावला आहे, हे सारेच जाणतात. परिणामी भुसे, महाजन, कोकाटे यांच्या नावाभोवती पालकमंत्रिपदाच्या नियुक्तीच्या केवळ वावड्या उठविला गेल्या. त्यानंतर मंत्रिमंडळात समावेश झालेले राष्ट्रवादीचे हेविवेट नेते छगन भुजबळ यांच्या नावाचा पालकमंत्रिपदाच्या चर्चेत समावेश झाला. भुजबळ स्वतःहून या चर्चेतून बाजूला झाले तो भाग वेगळा! पण, तरीही पालकमंत्रिपदाचा वाद संपुष्टात आला नाही. तत्कालीन कृषिमंत्री यांना रमीच्या पत्त्याचा डाव भोवला आणि त्यांना कृषिमंत्री पदावरून दूर सारत खेळण्यासाठी क्रीडा खाते दिले. त्यामुळे एका स्पर्धकाची पालकमंत्रिपदाच्या शर्यतीतून थोडी पिछेहाट झाली असली तरी राष्ट्रवादीने दावा अजिबात सोडलेला नाही. किंबहुना भुजबळ आणि झिरवाळ यांची नावे चर्चेत येऊ लागली आहेत. एवढ्या भाऊगर्दीत भुसे यांचेही नाव जरा पिछाडीवर पडल्याची चर्चा असतानाच शिवसेनेने आपला दावा पुन्हा अधोरेखित केला आहे. ही सारी गंमत पहाणाऱ्या भाजपने सामोपचाराची पिपाणी वाजवित कोणत्याही परिस्थितीत नाशिकचे पालकमंत्रिपद सोडायचेच नाही त्यादृष्टीने तिढा घट्ट करण्याकडे लक्ष केंद्रीत केल्याची खरपूस चर्चा आहे.


साधू-संत-महंत आणि आखाडेप्रमुखांसोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दीड दोन महिन्यांपूर्वी नाशिकला बैठक घेतली होती. त्यावेळी प्रसार माध्यमाच्या प्रतिनिधींनी त्यांना नाशिकच्या पालकमंत्रिपदाबाबत छेडले असता त्यांनी "कामे तर होताहेत ना!" कुंभमेळामंत्री आहेत ना!, एवढे बोलून पुन्हा लवकरच तिढा सुटेल, अशी सामोपचाराची पिपाणी वाजविली होती. गिरीश महाजन यांच्याकडे मुख्यमंत्र्यांनी कुंभमेळ्याची जबाबदारी सोपविली आहे. महाजन यांचे नाशिकचे पालकमंत्री म्हणून नावही घोषित केले होते; परंतु नाशिक शहर-जिल्ह्यातील समस्त भाई मंडळींनी एवढा जल्लोष केला की नाईलाजाने महाजन यांच्याकडून पुन्हा पालकमंत्रिपद काढून घ्यावे लागले होते. भाजपची तूर्त गोची झाल्याने भाजपने नाशिकच्या पालकमंत्रिपदाचा प्रश्न जरा बाजूलाच ठेवला आहे. पालकमंत्र्यांअभावी जिल्ह्याचा विकास ठप्प झाल्याची महायुतीच्या १४ आमदारांची बोंब असली तरी त्याकडे महायुती सरकारने पद्धतशीरपणे दुर्लक्ष केले आहे. आता राहिली गोष्ट स्वातंत्र्यदिनी ध्वजारोहण करण्याची तर कोणाला तरी तात्पुरता मान देऊन ध्वजवंदन पार पडले जाईल यात शंका नाही. आमच्या नाशिक जिल्ह्यातील चारही मंत्री मानकऱ्यांच्या पाठीमागे हात बांधून ध्वजारोहण कार्यक्रमात दिसली तर त्यात आश्चर्य वाटायला नको! आता स्वातंत्र्यदिनी कुणाला मान मिळतो ते देवाभाऊच जाणो!

## स्वातंत्र्यदिनी ध्वजारोहण कोणाच्या हस्ते...










### जनमानसात रंगताहेत विविध चर्चा

नाशिकच्या पालकमंत्रिपदाचा तिढा यंदा खूपच घट्ट झाला आहे. सामान्य नागरिक आता यावरून प्रश्न उपस्थित करू लागले आहेत. त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देण्याचे दायित्व मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी निभवावे, असे विरोधक बोलत आहेत. आगामी होऊ घातलेला सिंहस्थ कुंभमेळा पालकमंत्रिपदासाठी जणू अडसर ठरत आहे की काय असे वाटते. सिंहस्थासाठी हजारो कोटींचा येऊ घातलेल्या घसघशीत निधी वलयांकित झाला असून, महायुतीतील तीनही घटक पक्षांना हा निधी आपल्या हातात असावा, असे वाटत आहे. त्यामुळेच तिढा वाढला असून, पालकमंत्रिपदाचा प्रश्न अधांतरी लटकला आहे. "आले देवाजीच्या मना तिथे कुणाचे काही चालेना"! नाशिकच्या पालकमंत्रिपदाचा तिढा अस्मिता झाला आहे. त्यामुळे नागरिकांत विविधांगी चर्चेच्या वावड्या उठत असून, सरकारची मात्र शोभा होते आहे.




# गुडघेदुखीकडे दुर्लक्ष नको



व्याधी विकार

डॉ. अमोल नाईकवाडे

चालणे, उठणे, बसणे, पायऱ्या चढणे, अशा प्रत्येक कामात गुडघे महत्त्वाची भूमिका बजावतात. परंतु वृद्धत्व आणि शारीरिक हालचालींच्या अभावामुळे कधीकधी गुडघ्यातील तेलकटपणा कमी होतो. त्यात असलेले नैसर्गिक स्नेहन हळूहळू कमी होऊ लागते. परिणामी गुडघ्यांमध्ये वेदना, कडकपणा आणि चालण्यात अडचण येते.

गुडघ्यातील तेलकटपणा कमी होण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे कार्टिलेजची झीज होणे आणि सायनोव्हियल फ्लुइड कमी होणे. परंतु योग्य वेळी लक्ष दिल्यास गुडघ्यांचे आरोग्य चांगले राखता येते.

गुडघ्यांमधील वंगण कमी का होते?

* **वृद्धत्वः** वयाच्या चाळीशीनंतर शरीरातील नैसर्गिक स्नेहन कमी होऊ लागते. त्यामुळे सांध्यातील कोरडेपणा आणि वेदना वाढतात.

* **जास्त वजन आणि लठ्ठपणाः** शरीराचे अतिरिक्त वजन थेट गुडघ्यांवर परिणाम करते. त्यामुळे कूर्च्या लवकर झिजतात.

* **व्यायामाचा अभावः** नियमित हालचालींच्या अभावामुळे गुडघ्यांना स्नेहन प्रदान करणारे सायनोव्हियल फ्लुइड कमी होते.

* **चुकीच्या खाण्याच्या सवयीः** कॅल्शियम, व्हिटॅमिन डी आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिडचा अभाव हाडे आणि सांधे कमकुवत करतो.

* **दुखापत किंवा जुनी दुखापतः** गुडघ्यांमध्ये जुनी दुखापत किंवा संधिवाताची समस्येमुळे देखील स्नेहन कमी होऊ शकते.

**गुडघ्यातील स्नेहनाचे संरक्षण आणि वाढ करण्याचे मार्ग**

* ओमेगा-३ फॅटी ॲसिडचे सेवन

* मासे, अळशीच्या बिया, अक्रोड यांसारखे पदार्थ गुडघ्यांमध्ये स्नेहन राखण्यास मदत करतात.

* हलका व्यायाम करा

* चालणे, सायकलिंग आणि योगा यांसारखे हलके व्यायाम गुडघ्यांमध्ये द्रव परिसंचरण सुधारतात.

**वजन नियंत्रणात ठेवा**

* शरीराचे वजन नियंत्रणात ठेवल्याने गुडघ्यांवर कमी दबाव येतो.

* कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी घ्या.

# मिळवा रागावर नियंत्रण



मानसिक आरोग्य

रोजच्या आयुष्यात राग येणं अगदी स्वाभाविक आहे. पण रागावर नियंत्रण मिळवणंही तितकंच गरजेचं आहे. रागाचा परिणाम तुमच्या आरोग्यावरच नाही तर नातेसंबंधांवरही होतो. त्यामुळे रागाचं व्यवस्थापन करण्याच्या या टिप्स तुमच्या कामी येतील.


* तुम्हाला एका विशिष्ट परिस्थितीत राग येतो किंवा काही गोष्टी मनाप्रमाणे घडल्या नाहीत तर चिडचिड होते. मात्र उगाचच रागवण्यापेक्षा किंवा चिडचिड करत बसण्यापेक्षा समस्येवर उपाय शोधणं गरजेचं आहे. समस्या कितीही जटील असली तरी सुटू शकते. त्यामुळे समस्येवर उपाय शोधण्याचा प्रयत्न करा.

* रागाच्या भरात आपण बरंच काही बोलून जातो. या शब्दांमुळे समोरची व्यक्ती दुखावली जाते आणि नात्यांवर परिणाम होतो. त्यामुळे राग आल्यावर फार बोलू नका. शांत व्हा. राग कमी झाल्यावर स्वतःच्या भावनांना वाट करून द्या. शांतपणे चर्चा करा. आपली समस्या, प्रश्न किंवा व्यथा शांतपणे मांडा.

* राग येण्यामागच्या कारणांचा शोध घ्या. विशिष्ट प्रसंगी किंवा ठराविक कारणांमुळे राग येत असेल तर त्यावर उपाय शोधा. उगाचच रागवू नका. यामुळे तुम्ही परिस्थिती योग्य पद्धतीने हाताळू शकाल. तसंच तुमच्या हातून कोणतीही चुकीची कृती घडणार नाही.

* राग आल्यावर कशा प्रकारे प्रतिक्रिया द्यायची हे ठरवा.

# २५ टक्के जोडपी लठ्ठपणाचे बळी



जीवनशैली

साधारणपणे २३ पेक्षा जास्त बॉडी मास इंडेक्स (बीएमआय) भारतीयांसाठी लठ्ठपणाच्या श्रेणीत येतो. यामागे चुकीची जीवनशैली, फास्ट फूडचे जास्त सेवन, शारीरिक हालचालींचा अभाव, झोपेचा त्रास आणि वाढता ताण अशी अनेक कारणे आहेत.

'इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च' (आयसीएमआर) च्या एका अभ्यासानुसार देशातील प्रत्येक चार विवाहित जोडप्यांपैकी एक लठ्ठपणाशी झुंजत आहे. लठ्ठपणामुळे हृदयरोग, उच्च रक्तदाब, टाइप-२ मधुमेह, फॅटी लिव्हर आणि अनेक प्रकारच्या कर्करोगांचा धोका वाढतो.

लठ्ठपणामुळे स्लीप ॲप्निया तसेच नैराश्य आणि आत्मविश्वासाचा अभाव यासारख्या मानसिक आरोग्यसमस्यादेखील उद्भवू शकतात.

**जोडप्यांचे वजन वाढण्याचे कारण काय?**

'आयसीएमआर'च्या अभ्यासातून असे दिसून आले आहे, की लग्नानंतर जोडप्यांमध्ये वजन वाढण्याची समस्या सामान्य होत आहे. यामागील सर्वात मोठे कारण म्हणजे सामायिक जीवनशैली, म्हणजेच अनेकदा पती-पत्नी एकमेकांच्या खाण्याच्या सवयी स्वीकारतात.

**बाहेर खाणे**

रात्री उशिरा जेवण, कॅलरीयुक्त नाश्ता आणि गोड पेये वाढतात. लग्नाच्या सुरुवातीच्या काळात जोडप्यांचे सामाजिक जीवनदेखील अधिक सक्रिय असते. त्यात पार्ट्या आणि मेळाव्यांमध्ये अयोग्य खाण्याच्या सवयींचा समावेश असतो. याशिवाय जबाबदाऱ्यांमुळे शारीरिक हालचाली कमी होतात. व्यायाम आणि व्यायामासाठी वेळ काढणे कठीण होते.

**ते कसे टाळायचे?**

* संतुलित आहाराचा अवलंब करा
* घरगुती निरोगी अन्न खा आणि जंक फूडपासून दूर राहा.
* व्यायामासाठी वेळ काढा
* दररोज किमान ३० मिनिटे व्यायाम करा किंवा चालत जा.
* खाण्यासाठी एक निश्चित वेळ ठेवा
* रात्री उशिरा जेवणे टाळा.
* जोडप्यांनी एकत्रितपणे फिटनेस ध्येये निश्चित करावीत जेणेकरून प्रेरणा टिकून राहील.

# का जडतो उच्च रक्तदाब?



कुठे चुकतो आपण?

उच्च रक्तदाबाचा त्रास जडलेल्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढते आहे. अनेक तरुणांना उच्च रक्तदाब जडू लागला आहे. उच्च रक्तदाब हा जीवनशैलीशी संबंधित विकार असून यामुळे अनेक आजारांना निमंत्रण मिळतं. दैनंदिन आयुष्यातल्या काही सवयी उच्च रक्तदाबाला कारणीभूत ठरतात. कोणत्या आहेत या सवयी? जाणून घेऊ.

* बैठी जीवनशैली उच्च रक्तदाबाला निमंत्रण देते. सतत बसून राहिल्यामुळे ही व्याधी जडण्याची शक्यता अनेकपटींनी वाढते. बैठ्या कामामुळे शरीराभोवती चरबी साठू लागते. वजन वाढतं. आणि याची परिणती उच्च रक्तदाबामध्ये होते. उच्च रक्तदाबाचा धोका टाळण्यासाठी नियमित व्यायाम आणि शारीरिक हालचाल करणं गरजेचं आहे.

* मद्यपानामुळे उच्च रक्तदाबाचा धोका वाढू शकतो. त्यामुळे मद्याचं सेवन प्रमाणात करा.

* मीठाचं अतिसेवन उच्च रक्तदाबाला कारणीभूत ठरतं हे आपण जाणतो. वेफर्स, फरसाण, लोणची, पापड, प्रक्रिया केलेले पदार्थ यामध्ये मिठाचं प्रमाण अधिक असतं. मिठाच्या अतिसेवनामुळे मूत्रपिंड पाणी राखून ठेवतात. यामुळे रक्तवाहिन्यांवरचा ताण वाढतो आणि उच्च रक्तदाब जडू शकतो.

* विशिष्ट औषधांमुळे उच्च रक्तदाबाचा त्रास होऊ शकतो. त्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतंही औषध घेऊ नका.

* ताण हे सुद्धा उच्च रक्तदाबाचं महत्त्वाचं कारण ठरू शकतं. याशिवाय धूम्रपान, फळं आणि भाज्यांचं सेवन न करणं तसंच उच्च रक्तदाबाचा कौटुंबिक इतिहास यामुळेही ही व्याधी जडू शकते.

# सर्दीवर प्रभावी औषध



आयुर्वेद आणि विकार

सर्दी-खोकला ही सर्वसामान्य व्याधी आहे. हवामानबदलाच्या काळात सर्दी-खोकला त्रास देतो. साध्या सर्दी-खोकल्यावर उगाचच औषधांचा मारा करण्यापेक्षा घरगुती उपाय करणं अधिक योग्य ठरतं. एक आयुर्वेदिक औषधी पेय सर्दी-खोकल्यावर परिणामकारक ठरू शकतं.

आलं, दालचिनी, चक्रफूल, मध, ॲपल सिडर व्हिनेगार, लिंबाचा रस आणि पाणी असं साहित्य घ्या. आलं स्वच्छ धुवून घ्या. एका भांड्यात चार कप पाणी घ्या. त्यात आल्याचे काप घाला. दालचिनीच्या दोन कांड्या, दोन चक्रफूल घालून उकळून घ्या. १० मिनिटं बाजूला ठेवा. हे पाणी गाळून घ्या. त्यात प्रत्येकी दोन चमचे मध आणि ॲपल सिडर व्हिनेगार घाला. अर्ध्या लिंबाचा रस घाला. हे मिश्रण नियमितपणे प्या. हे औषध गरम किंवा थंड झाल्यावरही घेता येईल.

दालचिनी आणि आल्यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते. मध आणि चक्रफुलात बॅक्टेरियाविरोधी गुणधर्म असतात. याचा लाभ शरीराला होतो. हे औषध दोन दिवस फ्रीजमध्ये ठेवता येईल. दोन दिवसांनी ताजं औषध करून घ्या. यामुळे तुम्हाला बरेच लाभ होतील.

# ११मिनिटे चाला, व्याधी पळवा



आरोग्य चर्चा

डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे

चालणे अत्यंत फायदेशीर आहे. म्हणूनच आरोग्यतज्ज्ञ सर्व वयोगटातील लोकांना दररोज चालण्याचा सल्ला देतात. पायी चालणे ही सुदृढ राहण्यासाठी आणि निरोगी राहण्यासाठी सगळ्यात चांगला व्यायाम मानला जातो. आता आणखी एक संशोधन समोर आले आहे. 'ब्रिटिश जर्नल ऑफ स्पोर्ट्स मेडिसिन'मध्ये प्रकाशित झालेल्या लेखानुसार रोज केवळ ११ मिनिटे म्हणजे आठवड्यातून ७५ मिनिटे 'ब्रिस्क वॉक' केल्याने म्हणजे वेगाने पायी चालल्याने हार्ट स्ट्रोक आणि कर्करोगासारख्या आजारांचा धोका कमी होऊ शकतो. हे संशोधन जवळपास ३० लाख लोकांवर करण्यात आले. चालण्यामुळे आपल्या हृदयाचे आरोग्य, मानसिक आरोग्य आणि मूडदेखील सुधारतो. दररोज फक्त ११ मिनिटे चालल्याने शरीरात काही बाह्यबदलही दिसून येतात.

अकाली मृत्यूपासूनही बचाव

रोज केवळ ११ मिनिटे वॉक करून कार्डिओव्हॅस्क्युलर व्याधींचा धोका १७ टक्क्यांनी आणि कर्करोगाचा धोका ७ टक्क्यांनी कमी होतो, असेही संशोधनात आढळून आले. शिवाय चालण्याने अकाली मृत्यूपासूनही बचाव केला होऊ शकतो.

**शरीरात नेमके काय आणि कसे बदल घडतात?**

आपण दररोज ११ मिनिटे चालतो तेव्हा आपल्या पाठीचे आणि पायांचे स्नायू मजबूत होतात. त्यामुळे पोश्चर सुधारते. याचा आपल्या व्यक्तिमत्त्वावर चांगला परिणाम होतो.

**वजन कमी होणे**

चालण्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. शरीर अधिक तंदुरुस्त दिसते. अनेक अहवालांचे निकाल असे दर्शवतात, की चालण्यामुळे चयापचय वाढते.

# घट्ट पट्टा बांधणे हानीकारक




चुकीच्या सवयी

डॉ. कुंदन गायकवाड

आजकाल लोक घट्ट बेल्ट बांधणे हे स्टाईल आणि स्मार्टनेसचे लक्षण मानतात. पण घट्ट बेल्ट घालणे हानिकारक आहे. घट्ट पट्टा घालताना पोट, कंबर आणि आजूबाजूच्या नसांवर जास्त दाब पडतो. त्यामुळे अन्न व्यवस्थित पचत नाही. गॅस आणि आम्लतेची समस्या उद्भवू शकते. जास्त वेळ घट्ट पट्टा घातल्याने पाठदुखी, मणक्यावर परिणाम आणि पाय सुन्न होऊ शकतात. ही सवय हळूहळू गंभीर होऊ शकते. घट्ट पट्टा घातल्याने पेल्विक क्षेत्रावर म्हणजेच कंबर आणि खालच्या ओटीपोटावर जास्त दबाव पडतो. यामुळे त्या भागाच्या रक्ताभिसरणावर परिणाम होतो आणि तापमान वाढते. शुक्राणूंच्या निर्मितीसाठी, पेल्विक क्षेत्राचे तापमान सामान्यपेक्षा थोडे कमी असायला हवे. घट्ट पट्ट्यामुळे तापमानात वाढ झाल्यास शुक्राणूंची गुणवत्ता आणि संख्या दोन्ही कमी होऊ शकते.

घट्ट पट्टा पोटाभोवतीच्या नसा आणि रक्तवाहिन्यांवर दबाव आणतो. त्यामुळे तिथे रक्त व्यवस्थित पाहोचू शकत नाही. रक्ताभिसरण मंदावते. घट्ट बेल्ट घातल्याने पचनसंस्थेवर 'टॉर्निकेट' लावल्याप्रमाणे दबाव येतो. यामुळे ॲसिड रिफ्लक्स, गॅस आणि अपचन सारख्या समस्या उद्भवू शकतात. बेल्ट घट्ट करताच श्वास घेण्यास किंवा हालचाल करण्यास त्रास होत असेल, पोटात किंवा कंबरेमध्ये वेदना होत असतील किंवा बेल्ट तुमच्या त्वचेवर खुणा सोडत असेल, तर समजून घ्या की बेल्ट खूप घट्ट आहे. बेल्ट पुरेसा सैल असावा जेणेकरून तुम्ही बसून सहज श्वास घेऊ शकाल.

# घामाची दुर्गंधी देते संकेत!



जाणून घ्या

डॉ. महेश दळे

घाम येणे ही आपल्या शरीराची एक सामान्य प्रक्रिया आहे. जी शरीराचे तापमान नियंत्रित करण्यास मदत करते; परंतु घामातून विचित्र किंवा तीव्र वास येत असेल तर तो केवळ स्वच्छतेशी संबंधित नसून त्याचा एखाद्या आजाराशीदेखील संबंधित असू शकतो?

घामाचा वास कधीकधी शरीरातील अंतर्गत विकार दर्शवितो. तो फक्त साबणाने लपवता येत नाही. त्याचे नेमके कारण जाणून घेणे आणि त्यावर उपचार करणे खूप महत्त्वाचे आहे. घामाला गोड किंवा फळांचा वास येत असेल तर ते मधुमेहाचे लक्षण असू शकते. शरीरातील रक्तातील साखरेच्या असंतुलनामुळे हा वास येतो. याला 'किटोन श्वास' असेही म्हणतात. घामाचा वास अमोनिया किंवा लघवीसारखा तीव्र असेल, तर ते यकृत किंवा मूत्रपिंडांच्या कार्यात बिघाड झाल्याचे लक्षण असू शकते. शरीर कचरा पदार्थ योग्यरित्या बाहेर टाकू शकत नाही तेव्हा तो घामाद्वारे बाहेर पडतो. त्यामुळे वास येतो. जास्त घाम येणे आणि त्यातून येणारा वास हे थायरॉईडच्या समस्या किंवा हार्मोनल बदलांचे लक्षण असू शकते. हायपरथायरॉईडीझम असलेल्या लोकांना जास्त घाम येतो आणि शरीरातील रासायनिक बदलांमुळे वासदेखील तीव्र असू शकतो. बहुतेकदा जीवाणू किंवा बुरशी दुर्गंधीयुक्त घामासाठी जबाबदार असतात. शरीराचा घाम आणि त्वचेवर असलेले जीवाणू एकत्र आल्यावर एक वाईट वास निर्माण होतो. हा वास सामान्यापेक्षा जास्त असेल आणि बराच काळ टिकून राहिला, तर तो त्वचेच्या संसर्गाचे लक्षण असू शकतो.

**उपाय काय आहे?**

नियमित आंघोळ करा आणि स्वच्छता राखा. संतुलित आहार आणि भरपूर पाणी पिणे महत्वाचे आहे. डिओ किंवा परफ्यूमने वास लपवण्याऐवजी त्याचे कारण शोधा. घामाचा वास असामान्य असेल तर डॉक्टरांकडून तपासणी करून घ्या.

# दुधाचा त्रास आहे?



आरोग्यवेध

अनेकांना दूध किंवा दुग्धजन्य पदार्थ खाल्ल्यामुळे त्रास होतो. याला वैद्यकीय भाषेत 'लॅक्टॉस इनटॉलरन्स' असं म्हणतात. या व्याधीची किंवा समस्येची काही लक्षणं आहेत. या लक्षणांविषयी...

लॅक्टॉस हा नैसर्गिक साखरेचा एक प्रकार आहे. दुधात ही साखर आढळते. लॅक्टेस हे पाचक रसायन लॅक्टॉसचं विघटन करतं. यामुळे लॅक्टॉसचं सुलभपणे पचन होतं. मात्र शरीर पुरेशा प्रमाणात लॅक्टेसची निर्मिती करत नसेल तर लॅक्टॉस पचनात अडथळे निर्माण होतात आणि लॅक्टॉस इनटॉलरन्सची समस्या निर्माण होते. लॅक्टॉस इन्टॉलरन्स ही सर्वसामान्य समस्या आहे. जगभरातल्या जवळपास ७० टक्के लोकांना हा त्रास असतो. हायड्रोजन ब्रेथ चाचणीद्वारे या समस्येचं निदान होतं. लॅक्टॉस इनटॉलरन्सचा त्रास कमी करण्यासाठी दूध तसंच दुग्धजन्य पदार्थांचं सेवन कमी करायला हवं.

**लॅक्टॉस इनटॉलरन्सची लक्षणं**


लॅक्टॉस इनटॉलरन्समुळे पोटाच्या समस्या निर्माण होतात. बद्धकोष्ठता, पोट फुगणं, पोटावर ताण येणं अशी लक्षणं दिसू लागतात. पूर्णपणे न पचलेली लॅक्टॉस मोठ्या आतड्यात साठते. इथे तिच्या आंबण्याची प्रक्रिया सुरू होते. यामुळे निर्माण होणाऱ्या मिथेन वायूमुळे पचनशक्तीवर परिणाम होतो. परिणामी, बद्धकोष्ठतेचा त्रास होतो. अर्थात बद्धकोष्ठतेची इतरही कारणं आहेत. तंतूमय पदार्थांची कमतरता, पाण्याचं कमी प्रमाण यामुळेही बद्धकोष्ठतेचा त्रास होऊ शकतो. त्यामुळे बद्धकोष्ठता नेमकी कशामुळे आहे हे जाणून घ्यायला हवं.

लॅक्टॉस इनटॉलरन्सचा त्रास असणाऱ्या अनेकांना पचनाशी संबधित समस्या जाणवतच नाहीत. त्याऐवजी एक्झेमा, डोकेदुखी, तोंड येणं, थकवा येणं, एकाग्रता कमी होणं, स्नायू, सांधेदुखी, मूत्रमार्गाशी संबंधित समस्या अशी लक्षणं दिसून येतात. अर्थात ही लक्षणं इतर व्याधींमुळेही असू शकतात. लॅक्टॉसचा त्रास असेल तर शरीरात गॅस तयार होतो. लॅक्टॉस आंबण्याच्या प्रक्रियेमुळे कार्बन डाय ऑक्साइड, मिथेन, हायड्रोजन अशा वायूंची निर्मिती होते. हा प्रकार खूपच त्रासदायक असतो.

पोट फुगणं तसंच पोटदुखी ही लॅक्टॉस इनटॉलरन्सशी संबंधित सर्वसामान्य लक्षणं आहेत. लॅक्टॉस इन्टॉलरन्समुळे मोठ्या आतड्यातलं पाण्याचं प्रमाण वाढतं. यामुळे शौचही पाण्यासारखं पातळ होतं. जुलाब हे सुद्धा लॅक्टॉसच्या त्रासाचं लक्षण असू शकतं.

नवसंशोधन

## पोटावरची चरबी ठरते घातक!



सुटलेलं पोट खूप धोकादायक असतं. पोटावरच्या चरबीमुळे अनेक व्याधी जडू शकतात. पोटावर साठलेल्या चरबीमुळे हृदयविकारासह पक्षाघात, अस्थमासह इतर काही विकार होऊ शकतात. एका संशोधनातून ही बाब समोर आली आहे. एकदा हृदयविकाराचा झटका आलेल्यांच्या पोटावर चरबी साठली असेल तर त्यांना दुसऱ्यांदा हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता अनेक पटींनी वाढते, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. स्वीडनमधल्या कॅरोलिन्स्का संस्थेत याबाबत संशोधन करण्यात आलं. त्यावरून काही निष्कर्ष काढण्यात आले आहेत. त्यामुळे नियमित व्यायाम आणि पोषक आहाराचं सेवन करून वजन नियंत्रणात ठेवणं गरजेचं आहे.

दंतारोग्य

## टूथपेस्ट ठरू शकते घातक...



सकाळी उठल्यावर आपण सर्वात आधी दात घासतो. दात घासल्यानंतर तोंडाचं आरोग्य उत्तम राहील, असं आपल्याल्या वाटतं. पण प्रत्यक्षात टूथपेस्टमधल्या काही घटकांमुळे त्रास होऊ शकतो. टूथपेस्टमध्ये फ्लोराइडसह इतर काही घातक रसायनं असतात. दात घासताना थोडीफार पेस्ट पोटातही जाते. इतकंच नाही, तर टूथपेस्टमधल्या ग्लिसरिनमुळे दातांवर थर तयार होतो आणि हा थर दातांच्या आरोग्यासाठी मारक ठरू शकतो. यामुळे दात कमकुवत होऊ शकतात. त्यामुळे टूथपेस्ट खरेदी करताना त्यातल्या रसायनांची माहिती घ्या.

जपणूक केसांची

## टाळूची योग्य देखभाल



आपण केसांची काळजी घेतो. पण टाळूवरच्या त्वचेकडे आपलं दुर्लक्ष होतं. केसांचं आरोग्य जपण्यासाठी टाळूकडेही विशेष लक्ष द्यायला हवं. टाळूची स्वच्छता खूप महत्त्वाची आहे. केस धुताना टाळूलाही शँपू लावायला हवा. यामुळे टाळूवरची धूळ, घाण निघून जाते. अर्थात टाळू जास्त वेळा धुवू नये. टाळू सतत धुतल्यामुळे ती कोरडी होऊ शकते. नियमितपणे तेल लावायला हवं. तेलामुळे टाळूला ओलावा मिळतो. टाळू निरोगी असेल तर तुमचे केसही छान वाढू लागतील.

आजीबाईचा बटवा

## औषधी डिंक



डिंक खूप औषधी असतो. थंडीत डिंकाचे लाडू खाल्ले जातात. डिंकाच्या लाडूसोबत दूध प्यायल्यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते. थंडीच्या काळातल्या विविध विकारांचा सामना करायला शरीर सक्षम होतं. डिंकामुळे हाडं बळकट होतात, स्नायूंना खाद्य मिळतं. पाठीचा कणा बळकट होण्यासाठी डिंक खायला हवा. भाजलेल्या डिंकाच्या नियमित सेवनामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो. अशक्तपणा आला असेल तर डिंक खाता येईल. गर्भवती महिलांनी डिंक खायला हवा. मासिक पाळीबाबतच्या तक्रारीही डिंकामुळे दूर होतात.

# सेन्सेक्समध्ये 304 अंकांची उसळी

## डिफेन्स सेक्टरमध्ये जबरदस्त तेजी





**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

बुधवारी शेअर मार्केटमध्ये तेजी पाहायला मिळाली. सर्व सेक्टर्समध्ये चांगली-खासी खरेदी झाली, ज्यामुळे दोन्ही बेंचमार्क इंडेक्स हिरव्या चिन्हावर बंद झाले. सेन्सेक्समध्ये ३०४ अंकांची उसळी दिसली, तर निफ्टी ५० मध्ये १३२ अंकांची वाढ झाली.

बुधवारी सकाळी सेन्सेक्स ८०,४९२ पातळीवर उघडला आणि ०.३८ टक्क्यांच्या तेजीने ८०,५३९ पातळीवर बंद झाला. तर निफ्टी ५० देखील बुधवारी २४,५८६ पातळीवर उघडला आणि ०.५४ टक्क्यांच्या तेजीने २४,६१९ पातळीवर बंद झाला.

मिडकॅप आणि स्मॉलकॅप इंडेक्सने उत्तम कामगिरी केली. बीएसई मिडकॅपमध्ये ०.५६ टक्क्यांची तेजी झाली, तर बीएसई स्मॉलकॅपमध्ये ०.५८ टक्क्यांची वाढ झाली.

बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे मार्केट कॅप मागील सेशनच्या ४४३ लाख कोटी रुपयांवरून वाढून ४४५ लाख कोटी रुपये झाले. त्यामुळे गुंतवणूकदारांना एका दिवसात २ लाख कोटी रुपयांचा नफा झाला.

निफ्टी ५० च्या टॉप गेनर्समध्ये सर्वात वर अपोलो हॉस्पिटल्सचा समभाग राहिला, ज्यात ७.९१ टक्क्यांची तेजी झाली. त्यानंतर हिंडाल्कोमध्ये ५.०२ टक्क्यांची तेजी, डॉ. रेड्डीजमध्ये २.७२ टक्क्यांची तेजी, हिरो मोटोकॉर्पमध्ये २.६६ टक्क्यांची तेजी, सिप्लामध्ये २.५९ टक्क्यांची तेजी दिसली.

**सेन्सेक्स 80,539**

**निफ्टी 24,619**

निफ्टी ५० मध्ये सर्वाधिक तोटा इंडसइंड बँकेला झाला, जी १.२३ टक्क्यांनी घसरली. त्यानंतर अदानी पोर्ट्समध्ये ०.८२ टक्क्यांची घसरण, टायटन कंपनीमध्ये ०.५८ टक्क्यांची घसरण, आयटीसीमध्ये ०.५५ टक्क्यांची घसरण, अल्ट्राटेक सिमेंट्समध्ये ०.३९ टक्क्यांची घसरण झाली. सर्वाधिक वाढ निफ्टी इंडिया डिफेन्समध्ये झाली, जी २.६३ टक्क्यांनी वाढली. त्यानंतर निफ्टी कॅपिटल मार्केटमध्ये १.७३ टक्क्यांची तेजी, निफ्टी फार्मामध्ये १.७३ टक्क्यांची तेजी, निफ्टी इंडिया टुरिझममध्ये १.५० टक्क्यांची तेजी, निफ्टी मेटलमध्ये १.२६ टक्क्यांची तेजी, निफ्टी ऑटोमध्ये १.१२ टक्क्यांची तेजी झाली.

सेक्टोरल इंडेक्समध्ये सर्वाधिक तोटा निफ्टी पीएसयू बँकेला झाला, जी ०.१४ टक्क्यांनी घसरली.

# पुरीचे जगन्नाथ मंदिर उडवण्याची दहशतवाद्यांची धमकी

**पुरी, दि. १३ वृत्तसंस्था**



ओडिसामधील पुरी येथील जगन्नाथ मंदिर हे प्रसिद्ध मंदिरापैकी एक आहे. मात्र, हे जगन्नाथ मंदिर उडवण्याची धमकी देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे पुरीमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. या धमकीमुळे येथील भाविकांमध्येही भितीचं वातावरण पसरलं आहे. या घटनेनंतर पोलीस आणि सुरक्षा यंत्रणा अलर्ट झाल्या आहेत. पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे. तसेच मंदिराच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजचीही तपासणी सुरू करण्यात आली आहे.

जगन्नाथ मंदिराच्या बाहेर परिक्रमा मार्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हेरिटेज कॉरिडॉरजवळील दुसऱ्या एका मंदिराच्या भिंतीवर ओडिया आणि इंग्रजी अशा दोन भाषेत भिंतीवर एक संदेश लिहित धमकी देण्यात आली आहे. भिंतीवर लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे की, "जगन्नाथ मंदिरावर दहशतवादी हल्ला करतील आणि ते नष्ट करतील. तसेच कॉल करा, अन्यथा सर्वकाही उद्ध्वस्त होईल", असं त्या ठिकाणी लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे.

मंदिराच्या भिंतीवर काही फोन नंबर देखील लिहिलेले असल्याचं आढळून आलं. तसेच त्या ठिकाणी पंतप्रधान मोदी असे शब्दही लिहिले असल्याचं आढळून आलं आहे. त्यामुळे या संपूर्ण घटनेचं गांभीर्य लक्षात घेता पोलिसांनी तात्काळ पुढील तपास सुरू केला आहे. या बरोबरच हेरिटेज कॉरिडॉरच्या परिसरातील काही सजावटीचे दिवे देखील अचानक खराब झाल्याचं आढळून आलं आहे. सजावटीचे दिवे अचानक खराब कसे झाले? याबाबतही आता सवाल उपस्थित करण्यात येत आहेत.

एका स्थानिक भाविकाने सांगितलं की, "अलीकडेच झालेल्या एका गंभीर सुरक्षेच्या त्रुटीत काही अज्ञात व्यक्ती मंदिराच्या बाहेरील भिंतीवर चढून अनधिकृत प्रवेश केला. अद्याप त्याची ओळख पटलेली नाही. यातच आता या धमकीच्या घटनेमुळे आमची चिंता वाढली आहे. खरं तर हे मंदिर सतत देखरेखीखाली असूनही अशा ठिकाणी अशा प्रकारचे धमकी देणारे संदेश लिहिले जाऊ शकतात हे अस्वस्थ करणारं आहे."

एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितलं की, "भिंतीवर अशा प्रकारे धमकीचा संदेश लिहिलेल्या घटनेनंतर पोलिसांनी चौकशी सुरू केली आहे. अशा प्रकारचा संदेश गैरकृत्य म्हणून लिहिले गेले असल्याचाही संशय आहे.आम्ही आता कॅमेऱ्यांमधील फुटेजची तपासणी करत आहोत. आम्ही हे प्रकरण खूप गांभीर्याने घेत आहोत. मंदिर आणि भाविकांची सुरक्षा ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे."

# अमित आल्हाट यांचा स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी आझाद मैदानावर उपोषणाचा इशारा

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

१५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर मुंबईत एका व्यक्तीच्या अन्यायाविरोधातील लढाईने नवे वळण घेतले आहे. अमित आल्हाट या व्यक्तीने एससी/एसटी कायद्याच्या कलम १८अ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यास नागपाडा पोलिस ठाण्याने टाळाटाळ केल्यामुळे आणि दीर्घकाळ न्याय मिळत नसल्यामुळे १५ ऑगस्ट रोजी 'एक व्यक्तीचा अन्यायाविरोधात आंदोलन' सुरू करण्याची घोषणा केली आहे. हे आंदोलन हुतात्मा चौक येथून सुरू होऊन आझाद मैदानावर उपोषणाच्या रूपात सुरू राहणार असून, न्याय मिळेपर्यंत ते थांबणार नाही, असे आल्हाट यांनी सांगितले.

अमित आल्हाट हे एससी/एसटी कायद्याच्या कलम १८अ अंतर्गत तक्रारदार आहेत. त्यांच्या आरोपानुसार, अतुल प्रल्हाड पाटील, डीसीपी मोटर ट्रान्सपोर्ट विभाग, यांनी जातीय अत्याचार केले आहेत. पाटील यांनी आल्हाट यांना 'ये मांगटया' अशी जातीवाचक शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच, सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या नावाने विनापरवाना गैरहजर नोंदी करून त्या प्राथमिक आणि विभागीय चौकशीत वापरल्या. हे सर्व आल्हाट यांच्या नोकरीत अडथळा निर्माण करण्यासाठी आणि जातीद्वेषातून केले गेले, असा आरोप आहे.

आल्हाट यांच्या म्हणण्यानुसार, पोलिस अधिनियमाच्या कलम १० अन्वये पोलिस आयुक्त हे त्यांचे नियुक्ती अधिकारी आहेत. तरीही अतुल पाटील यांनी पदाचा गैरवापर केला. डीसीपी मुंबई एमटी यांना पोलिस अधिनियमाच्या कलम २५ अन्वये शिक्षा देण्याचा अधिकारच नाही, तरीही त्यांनी कायद्याचा गैरवापर करून जातीयवाद दाखवला. या प्रकरणी वारंवार तक्रारी करूनही आणि सातत्याने पाठपुरावा करूनही नागपाडा पोलिस ठाण्याने प्रकरण दाबले आहे. आरोपी अतुल पाटील हे पोलिस अधिकारी असल्यामुळे एससी/एसटी कायद्याच्या कलम १८अ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यास मनाई केली जात आहे, असा गंभीर आरोप आल्हाट यांनी केला आहे.

# भारताचे नागरिक व्हायच्या आधीच सोनिया गांधींचे मतदार यादीत नाव

## राहुल गांधींच्या मतचोरीच्या आरोपांना भाजपाचे प्रत्युत्तर

**नवी दिल्ली, दि. १३ वृत्तसंस्था**

गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा आणि काही राज्यांतील विधानसभा निवडणुकांमध्ये मतचोरी झाल्याचे म्हणत लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले होते. यावेळी राहुल गांधी यांनी भाजपालाही लक्ष्य केले होते. आता भाजपाने काँग्रेसवर थेट हल्ला चढवला आहे. भाजपाने आरोप केला आहे की, काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांचे नाव ४५ वर्षांपूर्वी, भारतीय नागरिक होण्यापूर्वीच, बेकायदेशीरपणे मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले होते.

या मुद्द्यावर भाजपा आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी ट्विट केले आहे, तर दुसरीकडे खासदार अनुराग ठाकूर यांनी एक पत्रकार परिषद घेतली. यादरम्यान त्यांनी तेजस्वी यादव आणि ममता बॅनर्जी यांनी केलेल्या आरोपांनाही उत्तर दिले.

दिल्लीतील भाजपा मुख्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत अनुराग ठाकूर म्हणाले की, "इंदिरा गांधी म्हणायच्या की, मतदार मूर्खांचा समूह असतात. राजीव गांधी निवडणूक हरले तेव्हा त्यांनी मतपत्रिकेला दोष दिला. ते म्हणायचे की निवडणुका ईव्हीएमवर घ्याव्यात आणि आता राहुल गांधी म्हणतात की निवडणुका मतपत्रिकेवर घ्याव्यात. हे लोक दुसऱ्यांवर आरोप करत राहतात, म्हणून आता कुटुंबानेच ठरवावे की कोणाला काय हवे आहे."

भाजपा आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी एक्स वरील पोस्टमध्ये आरोप केला आहे की, सोनिया गांधी यांचे नाव १९८० आणि १९८३ मध्ये दोनदा मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले होते. या दोन्ही वेळा त्यांच्याकडे भारताचे नागरिकत्व



नव्हते.

अमित मालवीय म्हणाले की, हे संपूर्ण प्रकरण निवडणूक कायद्याचे स्पष्ट उल्लंघनाचे उदाहरण आहे आणि कदाचित हेच कारण आहे की राहुल गांधी देखील अपात्र किंवा बेकायदेशीर मतदारांना कायदेशीर करण्याच्या बाजूने आहेत आणि "स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन"ला विरोध करत आहेत.

मालवीय यांनी त्यांच्या एक्स पोस्टमध्ये लिहिले आहे की, "सोनिया गांधी यांचे नाव पहिल्यांदा १९८० मध्ये मतदार यादीत नोंदवले गेले होते, त्यावेळी त्या इटालियन नागरिक होत्या आणि त्यांना अद्याप भारतीय नागरिकत्व मिळाले नव्हते. त्यावेळी गांधी कुटुंब पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे अधिकृत निवासस्थान १, सफदरजंग रोड येथे राहत होते."

अमित मालवीय पुढे म्हणाले की, "त्यावेळी या पत्त्यावर इंदिरा गांधी, राजीव गांधी, संजय गांधी आणि मनेका गांधी यांची नावे मतदार म्हणून होती, परंतु १९८० मध्ये नवी दिल्ली लोकसभा मतदारसंघाची मतदार यादी सुधारित करण्यात आली ज्यामध्ये १ जानेवारी १९८० ही 'पात्रता तारीख' म्हणून दाखवण्यात आली आणि मतदान केंद्र १४५ मध्ये अनुक्रमांक ३८८ वर सोनिया गांधी यांचे नाव जोडण्यात आले."

# अनाथांचा आधार मराठा लाइफ फौंडेशन

देशभक्ती आणि मातृभक्ती यांचा योग्य मिलाफ झाला की त्याचे कसे अनुकरणीय परिणाम दिसून येतात ते निवृत्त सैनिक किसन लोखंडे यांच्या बाबतीत दिसून येते. मूळच्या सातारा जिल्ह्यातील लोखंडे वसईमधील एका गावामध्ये 'मराठा लाइफ फाउंडेशन' स्थापन करून अनाथांचा विनामूल्य सांभाळ करत आहेत. त्यामध्ये मनोरुग्ण, मतिमंद, गतिमंद अशा गरजू अनाथांचा समावेश आहे. गेल्या १७ वर्षांपासून सुरू असलेल्या या कामाचा पसारा वाढला आहे. हे काम तसेच जोमाने होत राहावे यासाठी समाजाने सढळ हाताने आर्थिक मदत करण्याची गरज आहे.निव्वळ अनाथ, मनोरुग्णांची सेवा करावी या भावनेतून रोवलेल्या समाजसेवेच्या बीजाचा बघता बघता वटवृक्ष झाला आहे. या कामासाठी लोखंडे यांनी वसईच्या भाताणे येथे 'मराठा लाइफ फाउंडेशन' नावाची संस्था स्थापन केली. मागील १७ वर्षांपासून शेकडो मतिमंद, गतिमंद, वृद्ध यांच्यासाठी ही संस्था आधारवड झाली आहे. अनाथांचा कुणी वाली नसतो, तरीही ते धडपडून आपले आयुष्य जगतात. पण जे गतिमंद, मतिमंद आहेत, वृद्ध आणि आजारी आहेत, त्यांचे काय? रस्त्यावर एकाकी अवस्थेत निष्प्राण होणे ही अनेकांच्या आयुष्याची शोकांतिका असते. कुटुंबीयांचा आधार तुटलेले, बेघर



**लोकसेवार्थ**

झालेले मनोरुग्ण रस्त्यांवर दिशाहीन भटकताना आढळतात. उघड्यावरचे किंवा फेकलेले अन्न खाऊन गुजराण करतात. अशा गतिमंद, मतिमंद, अनाथांचे दु:ख पुसून त्यांना आधार देण्यासाठी 'मराठा लाइफ फाउंडेशन' संस्था कार्यरत आहे.

किसन लोखंडे हे मूळ शेतकरी व मेंढपाळ कुटुंबातील. त्यांच्या आई-वडिलांनी लहानपणापासून मुलांमध्ये सेवेचे संस्कार रुजवले. त्यामुळे किसन लोखंडे देशसेवेसाठी भारतीय लष्करात (आर्मी इंटेलिजेन्स) भरती झाले होते. निवृत्तीनंतर त्यांच्या आईने त्यांना अनाथांसाठी काम करण्याचा सल्ला दिला. त्यादृष्टीने ते २००६मध्ये कामाला लागले. ज्यांचे कोणीही नाही अशा अनाथ गतिमंद, मतिमंदांसाठी आणि मनोरुग्णांसाठी काम करण्याचे त्यांनी ठरवले. दोन वर्षे त्यांनी खासगी कंपन्यांमध्ये काम करून काही पैसे जमा केले. त्यामध्ये लष्करी सेवेतून मिळालेल्या निवृत्ती वेतनातील रक्कम टाकून वसई पूर्वेला भाताणे येथे ६० लाखांना १ एकर जागा घेतली. तेथे अनाथांसाठी आश्रम उभारला. संस्थेला नाव काय द्यायचे हा प्रश्न होता.पहिल्या आठवड्यात वसईतील पोलिसांना सापडलेले दोन मतिमंद रुग्ण आले. त्यांचा सांभाळ आणि शुश्रूषा लोखंडे कुटुंबीय करू लागले. त्यानंतर अनाथांच्या सेवेसाठी किसन लोखंडे कुटुंबासह वसईतच स्थायिक झाले. बघता बघता संस्थेची व्याप्ती वाढू लागली. पोलिसांना रस्त्यावर जे जे बेघर गतिमंद, मतिमंद, मनोरुग्ण, वृद्ध आजारी व्यक्ती आढळायच्या त्यांना संस्थेत आणले जाऊ लागले. त्यांच्या कुटुंबीयांचा शोध लागेपर्यंत त्यांना येथे ठेवले जाते. त्यांना उपचार आणि निगा पुरवली जाते. आतापर्यंत संस्थेकडे आलेल्या १३००हून अधिक व्यक्तींना उपचारानंतर त्यांच्या कुटुंबांचा शोध लावून सुखरूप पाठवण्यात आले आहे. भटक्या गायी, जखमी कुत्री यांचीदेखील संस्थेत आणून देखभाल केली जाते. 'मराठा लाइफ फाउंडेशन' हे पूर्णपणे नि:शुल्क सेवा करणारी संस्था आहे. येथील ९० टक्के रुग्ण पोलिसांनी आणलेले असतात. येथे दाखल झालेल्या रुग्णांना स्वच्छ अंघोळ घालून त्यांची वैद्याकीय तपासणी केली जाते. ते आजारी असल्यास त्यांच्यावर उपचार केले जातात. गरजेप्रमाणे काहींना रुग्णालयात दाखल केले जाते.संस्थेकडे असे २३५ रुग्ण आहेत. २० मनोरुग्ण असून त्यांच्यासाठी स्वतंत्र दालन तयार करण्यात आले आहे. संस्थेचा सर्वाधिक खर्च औषधोपचारांवर होतो. कधीकधी रुग्णांना खासगी रुग्णालयात दाखल करावे लागते. आजारी रुग्णांसाठी रुग्णालय आणि वाढत्या संख्येमुळे आणखी इमारत तयार करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी संस्थेला आर्थिक निधीची गरज आहे.

**लोकजागर**

# सरन्यायाधीश हे सर्वोच्च न्यायालयाच्या इतर न्यायाधीशांपेक्षा वरिष्ठ किंवा श्रेष्ठ नाही- सरन्यायाधीश

**नवी दिल्ली, दि. १३ वृत्तसंस्था**

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी नुकतेच सर्वोच्च न्यायालयाच्या इतर न्यायाधीशांबद्दल एक महत्त्वाचे विधान केले आहे. ते म्हणाले की, सरन्यायाधीश हे सर्वोच्च न्यायालयाच्या इतर न्यायाधीशांपेक्षा वरिष्ठ किंवा श्रेष्ठ नाहीत. रितू छाब्रिया विरुद्ध युनियन ऑफ इंडिया आणि इतर, या खटल्याचा २६ एप्रिल २०२३ रोजी न्यायालयाचा निर्णय मागे घेण्यासाठी ईडीने केलेल्या अर्जावर त्यांच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यीय खंडपीठ सुनावणी करत असताना त्यांनी ही टिप्पणी केली.



ईडीशी संबंधित या प्रकरणात, सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठात न्यायमूर्ती विनोद चंद्रन आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया यांचाही समावेश होता. २०२३ च्या निर्णयात, निवृत्त न्यायमूर्ती कृष्णा मुरारी आणि न्यायमूर्ती सी. टी. रविकुमार यांच्या दोन सदस्यीय खंडपीठाने तपास यंत्रणांनी तपास पूर्ण होण्यापूर्वीच न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्याच्या पद्धतीवर टीका केली होती.

सर्वोच्च न्यायालयाच्या २०२३ च्या खंडपीठाने म्हटले होते की, अशा प्रकरणांमध्येही आरोपींचा जामीन नाकारण्याचा अधिकार रद्द केला जाणार नाही. कायद्यानुसार, कनिष्ठ न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये, आरोपीच्या अटकेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत आणि सत्र न्यायालयात ९० दिवसांच्या आत आरोपपत्र दाखल करावे लागते. जर या कालावधीत आरोपपत्र दाखल झाले नाही तर आरोपीला जामीन मिळणाचा अधिकार असतो.

२६ एप्रिलच्या निकालानंतर काही दिवसांनी, ईडीने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आणि तत्कालीन सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर युक्तीवाद केला की, दिल्ली उच्च न्यायालयाने रितू छाब्रिया प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या आधारे चौकशी सुरू असलेल्या एका प्रकरणात एका आरोपीला जामीन मंजूर केला आहे. या निकालाचे देशभर परिणाम होतील.

मंगळवारी, सरन्यायाधीश गवई यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या इतर कोणत्याही खंडपीठाच्या निर्णयांविरुद्ध अपीलांची सुनावणी करणाऱ्या एकल न्यायाधीशांच्या खंडपीठाबद्दल, जरी ते सरन्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठ असले तरी, नाराजी व्यक्त केली.

"जेव्हा या न्यायालयाच्या दोन विद्वान न्यायाधीशांचे खंडपीठ काही दिलासा देते, तेव्हा दुसरे खंडपीठ, केवळ वरिष्ठ न्यायालयामध्ये बसल्यामुळे, त्या निर्णयावर अपील करू शकते का", असा प्रश्न सरन्यायाधीश गवई यांनी विचारला.

सरन्यायाधीश गवई म्हणाले की, "आम्ही न्यायालयीन शिष्टाचार आणि न्यायालयीन शिस्तीचे पालन करतो. जर असे करत राहिलो, तर एखादे खंडपीठ, केवळ एखादा आदेश आवडत नसल्यामुळे, दुसऱ्या खंडपीठाच्या आदेशांमध्ये हस्तक्षेप करत राहील."

सरन्यायाधीश म्हणाले, "भारताचे सरन्यायाधीश इतर न्यायाधीशांपेक्षा श्रेष्ठ नाहीत. ते इतर न्यायाधीशांमध्ये केवळ पहिले आहेत. सरन्यायाधीश या न्यायालयाच्या इतर सर्व न्यायाधीशांप्रमाणेच न्यायिक अधिकारांचा वापर करतात."

# ओबीसी क्रीमीलेयरबाबत केंद्र मोठ्या निर्णयाच्या तयारीत

**नवी दिल्ली, दि. १३ वृत्तसंस्था**

केंद्र सरकार ओबीसी प्रवर्गाअंतर्गत विविध वर्गांना आरक्षणाचा लाभ मिळवून देण्यासाठी क्रिमी लेयरच्या उत्पन्न मर्यादेत एकसमानता आणण्याच्या प्रस्तावावर गांभीर्याने विचार करत असल्याचे समजते. असे केल्यानं अनेक प्रकारच्या केंद्रीय आणि राज्य सरकारी संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, विद्यापीठे आणि अन्य संस्थांमध्ये ओबीसी आरक्षणाचा लाभ मिळविण्यासाठी क्रिमी लेयरची उत्पन्न मर्यादा समान ठेवली जाईल. याबाबत सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण, शिक्षण, कार्मिक आणि प्रशिक्षण विभाग (DoPT), कायदेशीर व्यवहार, कामगार आणि रोजगार, सार्वजनिक उपक्रम, नीती (NITI) आयोग आणि राष्ट्रीय मागासवर्ग आयोग (NCBC) यांच्याशी सल्लामसलत करण्यात आली आहे. त्यानंतर हा प्रस्ताव तयार करण्यात आल्याचे समजते.

# यशोगाथा स्वीटकोर्नच्या व्यवसायाची

अलिकडच्या काळात अनेक तरुण विविध प्रकारचे व्यवसाय करुन मोठा नफा मिळवत आहेत. काहीजण नोकरी सोडून देखील यशस्वी व्यवसाय करत आहेत. तर कमी शिक्षण झालेले तरुण देखील यशस्वी व्यवसाय करताना दिसत आहेत. आज आपण अशाच एका तरुणाची यशोगाथा पाहणार आहोत. या तरुणाने 9 वी शिक्षण घेऊनसुद्धा व्यवसायाच्या माध्यमातून भरारी घेतली आहे. कृष्णदेव रोकडे असं सोलापूरच्या या तरुणाचं नाव आहे.

सोलापूरच्या कृष्णदेव रोकडे यांनी 500 रुपयांपासून स्वीट कॉर्न विकण्याचा व्यवसाय सुरू केला आहे. आज ते दरमहा 40 ते 45 हजार रुपये कमावत आहेत. रोकडे हे दर वर्षाला या व्यवसायातून 13 ते 14 लाख रुपये कमावत आहेत. ज्यामुळं तरुणांना प्रेरणा मिळत आहे. आजकाल अनेत तरुण वेगवेगळ्या प्रकारच्या व्यवसायात नशीब आजमावत आहेत. यापैकी काही व्यवसाय आधीच बाजारात आहेत आणि काही नवीन आहेत. परंतु असे काही लोक आहेत जे कठीण आणि आव्हानात्मक व्यवसाय निवडतात आणि त्यात यश मिळवतात. सोलापूर जिल्ह्यातील कृष्णदेव रोकडे यांनीही असाच व्यवसाय निवडला आहे. त्यांनी स्वीट कॉर्न




विकण्याचा व्यवसाय सुरू केला आणि आज ते या व्यवसायातून ते लाखो रुपये कमवत आहेत.

**शून्यातून विश्व**

कृष्णदेव मधुकर रोकडे हे पंढरपूर तालुक्यातील तुंगत गावचे रहिवासी आहेत. त्यांचे शिक्षण 9 वी पर्यंत झाले आहे. परंतु त्यांचा संघर्ष आणि मेहनतीनं त्यांना यश मिळवून दिलं आहे. 2012 मध्ये कृष्णदेव यांनी अवघ्या 500 रुपयांमध्ये स्वीट कॉर्न विकण्याचा व्यवसाय सुरू केला होता. सुरुवातीला त्याला ग्राहकांचा अत्यल्प प्रतिसाद मिळाला, पण त्याने हार मानली नाही. हळूहळू स्वीट कॉर्न खाणाऱ्यांची संख्या वाढू लागली आणि त्यांचा व्यवसायही विस्तारू लागला.

आज कृष्णदेवचा स्वीट कॉर्नचा व्यवसाय सोलापूर, मोहोळ, पंढरपूर, अंगार, कामठी आणि कुरुलपर्यंत पसरला आहे. लोक त्यांच्या शंभूराज ब्रेकफास्ट सेंटरमध्ये स्वीट कॉर्न चाखण्यासाठी येतात. 500 रुपयांपासून सुरू झालेल्या या व्यवसायातून त्यांना आता दरमहा 40 ते 45 हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. प्रथम एका हॉटेलपासून व्यवसाय सुरू करणाऱ्या कृष्णदेव यांनी आता एकाच हॉटेलमध्ये तीन हॉटेल्स बांधली आहेत. तिन्ही हॉटेलमध्ये स्वीट कॉर्न विक्रीचे काम सुरू आहे. या तिन्ही हॉटेलमधून ते दरवर्षी 13 ते 14 लाख रुपयांचा व्यवसाय करत आहेत.एकूणच कृष्णदेव सारखा एक तरुण जरी त्याच्याकडे शिक्षणाचा अभाव असला तरी प्रचंड जिद्द,आत्मविश्वास आणि मेहनतीच्या जोरावर आज एक यशस्वी उद्योजक म्हणून नामांकित झालेला आहे हि व्यवसाय करण्याची इच्छा असलेल्या तमाम तरुणासाठी एक आदर्श यशोगाथाच आहे.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# त्यांनी भाजपची साथ सोडली तर एकत्र येण्याचा विचार करू - रोहित पवार

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते तथा आमदार रोहित पवार यांनी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या संदर्भात मोठं भाष्य केलं आहे. 'अजित पवार यांनी भाजपाची साथ सोडली तर आम्ही एकत्र येण्याचा विचार करू', असं रोहित पवार यांनी एका वृत्तवाहीनीशी बोलताना म्हटलं आहे. त्यांच्या या विधानानंतर राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा चर्चांना उधाण आलं आहे.



भविष्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येतील का? किंवा दोन्ही राष्ट्रवादी पक्षांनी एकत्र यावं का? काय वाटतं? असा प्रश्न विचारण्यात आला असता रोहित पवार यांनी म्हटलं की, "मी तुम्हाला सध्या एकच सांगतो की आम्ही भाजपाच्या विरोधात आहोत. भाजपाच्या विचारसरणीच्या विरोधात आहोत. त्यामुळे उद्या भविष्यात अजित पवार यांनी भाजपाची साथ सोडली आणि अजित पवार यांनी शरद पवार यांच्याबरोबर, पुरोगामी विचाराबरोबर राहण्याचा विचार केला तर त्यावेळेस आम्ही विचार करू. मात्र, ते जर भाजपाबरोबर असतील तर आम्ही एकत्र येऊ शकत नाहीत. पण त्यांनी (अजित पवार) भाजपाला सोडलं तर आम्ही आमच्या सर्व पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन आपण काय करायचं? हा निर्णय घेतला जाईल", असं मोठं विधान रोहित पवार यांनी केलं आहे.

# ठाकरे सेनेचा चक्काजाम

## महायुती सरकारविरोधात घोषणाबाजी

**कुडाळ, दि. १३ प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गाची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. गणेशोत्सव अगदी जवळ आला असतानाही महामार्गाची दुरुस्ती अद्याप करण्यात आलेली नाही. या निष्क्रियतेविरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने कुडाळ तालुक्यातील हुमरमळा येथे बुधवारी भर पावसात "हायवे चक्काजाम" आंदोलन करण्यात आले.



शिवसेना ठाकरे गटाचे माजी आमदार वैभव नाईक यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन झाले. त्यांनी सांगितले की, महामार्गाचे काम पूर्ण होईपर्यंत आंदोलन सुरूच राहणार आहे. आंदोलन पुकारल्यानंतर मुंबईत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बैठक आयोजित केली आहे. दुसरीकडे सिंधुदुर्गात महामार्गावरील खड्डे बुजवण्याचे काम हाती घेतले. हीच कामे गेली वर्षभर केली गेली नव्हती. पवार यांनी बैठक लावली खरी पण त्या बैठकीला कोकणातील दोन्ही मंत्र्यांना बोलविण्यात आले नाही; म्हणजेच उपमुख्यमंत्र्यांना सुद्धा कळले आहे की, हे दोन्ही मंत्री काही कामाचे नाहीत.

मुंबई -गोवा महामार्गाला टक्केवारीमुळे खड्ड्यांचे ग्रहण लागले आहे, हेच आताच्या पालकमंत्र्यांचे कर्तुत्व आणि कार्य आहे. कणकवली बाजारपेठ मध्ये न्यायालयांच्या आदेशाचे अवमान होत आहे तरीसुद्धा त्याकडे कुणी ढुकुनही पाहत नाही. काही ठिकाणी आरो लाईनच्या बाहेरची बांधकामे काढली जात असतील तर ती बांधकामे सर्वांचीच काढा, असे माजी आ. परशुराम उपरकर यांनी सांगितले

महासागर NASHIK Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219

महासागर नाशिक मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219